सुविचार

प्रयत्न करणे तेव्हाच थांबवा जेव्हा तुम्ही ध्येयाच्या शिखरावर ताठ मानेने उभे असाल.

पश्चिम विदर्भातील सर्वाधिक अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

बुलडाणा ● वर्ष १ ● अंक ९८ ● मंगळवार, दि. १ सप्टेंबर २०२६ ● मूल्य ३ ● पृष्ठे ४

RNI No.- MAHMAR/ 26 /A3072 Postal Regn. No. AKL DN /283 / 2024-2026 Web.http://epaper.citynewssuperfast.com







## »थोडक्यात

### अण्णा हजारे बॉम्बे हॉस्पिटलमध्ये!

अहिल्यानगर : ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांची प्रकृती अचानक बिघडल्याने त्यांना उपचारासाठी मुंबईतील प्रसिद्ध बॉम्बे हॉस्पिटलच्या अतिदक्षता विभागात (आयसीयू) दाखल करण्यात आलं आहे. सध्या त्यांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती समोर आली असून, डॉक्टरांचे विशेष पथक त्यांच्या प्रकृतीवर बारकाईने लक्ष ठेवून आहे. अण्णा हजारे यांना गेल्या काही दिवसांपासून प्रचंड खोकला, तीव्र ताप, अशक्तपणा तसेच शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी होण्याचा त्रास जाणवत होता. उपचार सुरू असूनही प्रकृतीत अपेक्षित सुधारणा होत नसल्याने त्यांना तातडीने मुंबईला हलवण्याचा निर्णय घेण्यात आला.

---

### मोदींचा फोटो हटवल्या प्रकरणी मनसेच्या दोन पदाधिकाऱ्यांना अटक

पुणे : पुण्यातील सरकारी तंत्रशिक्षण महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या सुविधांची पाहणी करण्यासाठी गेलेले महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेचे अध्यक्ष अमित ठाकरे यांचा दौरा चांगलाच चर्चेत आला. याठिकाणी छत्रपती शिवाजी महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शेजारी नरेंद्र मोदींचा फोटो लावण्यात आल्याचे त्यांच्या निदर्शनास आणून दिले. आणि फोटो काढायला लावला यापककरणी त्यांना अटक करण्यात आली असून अमित ठाकरेंसह २० ते २५ जणांवर पुण्यातील चतुःश्रृंगी पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला.

---

### राज्यात तब्बल २ कोटी मतदार वगळले!

मुंबई: राज्याच्या मतदार याद्यांच्या विशेष सखोल पडताळणी (एसआयआर) मोहिमेंतर्गत महाराष्ट्रातील सर्व २८८ विधानसभा मतदारसंघांची प्रारूप मतदारयादी सोमवारी जाहीर करण्यात आली असून 'एसआयआर'पूर्व मतदारयादीच्या तुलनेत तब्बल २ कोटी ६ लाख ८८ हजार ४८७ मतदारांची नावे वगळण्यात आली आहे. हे प्रमाण तब्बल २१.१४ टक्के इतके आहे. निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार, 'एसआयआर'पूर्वी राज्यात ९ कोटी ७८ लाख ५४ हजार ४९ मतदार होते.

# डॉ. नागपुरे यांच्यावर मेहेरबान कोण!

## कृषी विद्यापीठाच्या जागेत सिमेंट काँक्रीटचा प्लाँट !

प्रतिनिधी | १ सप्टेंबर

अकोला : शेतकऱ्यांचे भवितव्य घडवण्यासाठी, नवनवीन संशोधनासाठी ज्या डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाला जमिनी दिल्या गेल्या, त्याच पवित्र संशोधन भूमीवर सिमेंट काँक्रीक चा प्लँट उभारल्याचा खळबळजनक प्रकार उघडकीस आला आहे. विद्यापीठ प्रशासनाची कुठली ही मान्यता न घेता १५ एक्कर भाड्याने दिल्याचे चित्र आहे. डॉ.नागपूरे यांनी विद्यापीठाला अंधारात ठेवून हा उद्योग केला आहे. डॉ.नागपूरे यांच्यावर देखरेख डॉ.माने यांची होती अशी माहिती आहे. तर या सर्व प्रकरणात नागपूरे यांनी तीन लाख रुपये कंत्राटदार कडून घेत विद्यापीठाची फसवणूक केल्याची माहिती आहे.कृषी विद्यापीठ भ्रष्टाचार (माने,म्हातारमारे,राठोड) प्रकरणात आज गुन्हा दाखल होण्याची शक्यता एम आय डी सी पोलिस दलातील सूत्रांनी व्यक्त केली आहे. वणी रंभापूर येथील मध्यवती संशोधन केंद्रात सिमेंट काँक्रीट निर्मितीसाठी विद्यापीठाची १५ एकर जमीन थेट कंत्राटदाराला दिल्या गेली आहे.




या जमीनीवर बियाण्यांचे संशोधन अपेक्षित आहे. नवे उत्पादन अपेक्षित आहे. पण, ज्यांना विद्यापीठातील बॅटरी घरी नेण्याचा अनुभव आहे अशांनी थेट विद्यापीठाची परवानगी न घेता १५ एक्कर जागा कंत्राटदाराला परस्पर दिली आहे. कृषी विद्यापीठातील कुलसचिव कार्यालयास याचे कारभाराचा थांगपत्ता नाही. इतकेच नाही तर विद्यापीठाच्या कुठल्याही वरिष्ठ अधिकाऱ्याची मान्यता नाही. मध्यवर्ती संशोधन केंद्रावर कृषी विद्या विभागाचे अधिकारी नेमण्याची गरज असताना अर्थशास्त्राचे सहाय्यक प्राध्यापक डॉ.शिवाजीराव नागपूरे यांची नियुक्ती येथे कशी केल्या गेली हा देखील संशोधनाचा विषय आहे. शासनाची या मध्यमर्ती संशोधन केंद्रास मान्यता नाही. त्यात डॉ.नागपूरे यांनी परस्पर कंपनीला १५ एक्कर जमीन देत मोठा घोटाळा केला आहे. इतकेच नाही तर कृषी विद्यापीठाच्या वरिष्ठांनी नुकतीच या ठिकाणी पाहणी करुन गेले त्यावेळी हा प्लँट त्यांना दिसला नाही का असा प्रश्न उपस्थित होत आहे.

या सर्व प्रकरणाची चौकशी करण्याची गरज असून डॉ.नागपूरे यांच्यावर नियुक्तीपुर्वी त्यांच्यावर काही गुन्हे दाखल होते काय याचा ही शोध विद्यापीठाने घेण्याची गरज आहे. या सर्व प्रकरणात डॉ.नागपूरे यांच्याशी संपर्क करण्याचा प्रयत्न केला असता तो झाला नाही.

### पंधरा एक्कर जमीनीचे नुकसान

विद्यापीठाची कुठलीही परवानगी न घेता १५ एक्कर जमीनीचे सुपिकता घालविण्यात आली आहे. या प्रकरणाची गंभीर चौकशी करत डॉ.शिवाजीराव नागपूरे यांच्यावर कठोर कारवाईची गरज आहे. अशा प्रकारे विद्यापीठाच्या संपत्तीवर डोळा ठेवणाऱ्यांना धडा शिकविण्याची गरज आहे. त्याच बरोबर विद्यापीठाच्या मीटरमधूनच या कंपनीला इलेक्ट्रीक सप्लाय दिला आहे काय याचा शोध घेण्याची गरज आहे. येथे वीज चोरीचा थेट गुन्हा दाखल होतो. विद्यापीठ कर्मचाऱ्यांकडून पाण्याचे पैसे घेते या कॉन्ट्रक्टरकडून पाण्याचे किती पैसे घेतले हा प्रश्नच आहे. क्वॉर्टर मध्ये रहिवासी नसताना येथे वीज मीटर असून त्याचे पैसे कोण भरत आहे. मध्यवती संशोधन केंद्रासाठी गेल्या तीस वर्षापासून किती ॲडव्हान्स उचलला याचा शोध विद्यापीठ प्रशासनाने घेतल्यास मोठा घोटाळा समोर येण्याची दाट शक्यता आहे. सरकारचे अनुदान बंद असताना मध्यवती संशोधन केंद्र बंद करत ५ हजार एक्कर जमीन शेतकऱ्यांना परत देण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

## अकोला में राजनीतिक दिग्गजों का 'फाटो ढोल' सिंधी समाज ने 'दादा' पर ही जताया पूरा 'विश्वासु'

प्रतिनिधी | १ सप्टेंबर



अकोला : अकोला येथील पूज्य सिंधी जनरल पंचायत निवडणुकीचा निकाल जाहीर झाला असून कन्हैयालाल 'दादा' रंगवाणी यांनी १,०१५ मतांच्या प्रचंड फरकाने दणदणीत विजय संपादन केला आहे. या निवडणुकीत भाजप महानगर उपाध्यक्ष विनोद मनवाणी यांच्यासह अनेक वर्तमान व माजी नगरसेवक आणि राजकीय पक्षांचे बडे दिग्गज मैदानात उतरले होते. मात्र, सिंधी समाजाने सर्व राजकीय दबाव आणि समीकरणे बाजूला सारत 'दादा' रंगवाणी यांच्यावरच पुन्हा एकदा विश्वास दाखवला आहे.

एकूण २,५१७ मतदारांपैकी २,१४३ जणांनी मतदानाचा हक्क बजावला होता. मतमोजणीच्या अखेरीस कन्हैयालाल रंगवाणी यांना तब्बल १,५७४ मते मिळाली. तर त्यांचे मुख्य प्रतिस्पर्धी विनोद मनवाणी यांना ५५९ मते आणि दौलत चंदवाणी यांना अवघी १० मते मिळाली.

रंगवाणी यांनी १,०१५ मताधिक्य मिळवत प्रतिस्पर्ध्यांचा धुव्वा उडवला.या निवडणुकीत राजकीय नेत्यांनी मोठी ताकद पणाला लावली होती. मात्र, सिंधी समाजातील जनतेने राजकीय दबावाला थारा न देता सामाजिक एकतेला आणि विश्वासाला प्राधान्य दिले. 'राजकीय ताकद आपल्या जागी, पण जनतेचा विश्वास हीच खरी ताकद,' असा सडेतोड संदेश या निकालातून समोर आला आहे. विजयानंतर रंगवाणी समर्थकांनी शहरात मोठा जल्लोष साजरा केला.

## 'पीएनबी' बँकेच्या लॉकरमध्ये नकली नोटांचे घबाड!

### ७.४ कोटींच्या बनावट नोटा, ऑडिटमध्ये घोटाळा उघडकीस

वृत्तसंस्था | १ सप्टेंबर

**सहारनपूर** : उत्तर प्रदेशातील सहारनपूरच्या पंजाब नॅशनल बँकेच्या घंटाघर येथील सोफिया मार्केट करन्सी चेस्टमध्ये हा घोटाळा झाला आहे. ऑगस्ट महिन्यात ऑडिटदरम्यान बँकेच्या लॉकरमध्ये ७.४० कोटी रुपयाच्या कथित बनावट नोटा आढळून आल्या. यापूर्वी १०-११ ऑगस्ट रोजी आरबीआयला पाठवलेल्या रकमेमध्ये ४.३६ लाख रुपयांची बनावट कॅश आढळून आली होती. त्यानंतर बँक प्रशासनाने चौकशी समिती बसवली. त्यानंतर वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या शिफारसीनंतर एफआयआर दाखल करण्यात आला आहे. नोडल अधिकारी अरुण कुमार चौबे यांच्या तक्रारीनंतर पोलीस आणि बँकेचे अधिकारी सीसीटीव्ही फुटेजची तपासणी करत आहेत.

आरबीआयमध्ये पाठवलेल्या करन्सीत बनावट रक्कम मिळाल्यानंतर ही घटना उघडकीस आली. पीएमबीच्या मुख्य प्रबंधक निशा सिंह यांच्या मते, १०-११ ऑगस्टच्या आसपास आरबीआयला रक्कम पाठवण्यात आली होती. त्यात ४.३६ लाख रुपये कमी आढळून आले. त्यानंतर बँक स्तरावर एक चौकशी समिती स्थापन करण्यात आली. चौकशीमध्ये बँकेत ७.४० कोटी रुपयांच्या बनावट नोटा असल्याचे आढळून आले. नोडल अधिकारी अरुण कुमार चौबे यांच्या तक्रारीनंतर मंडल कार्यालयाचे वरिष्ठ प्रबंधक रवि कुमार, करेन्सी चेस्ट प्रबंधक सुशील शर्मा आणि हरियाणाच्या जगाधरी येथील करेन्सी चेस्ट प्रबंधक अमित कुमार यांच्यावर बनावट नोटा प्रकरणी तक्रार दाखल करण्यात आली आहे. तसेच हाऊस किपर विशाल कुमार याच्यावर कारवाई करण्यात आली आहे. बँकेने या प्रकरणाशी संबंधित चौघांना तात्काळ सस्पेंड केलं आहे. तसेच पोलीस आणि बँक आता वेगवेगळ्या शाखेतील चेस्ट पर्यंत पोहोचलेली रक्कम, कॅश रेकॉर्ड, नोटांची पॅकिंग, गणती आणि जुळवण्याची प्रक्रिया सर्व खंगाळून काढत आहे. या शिवाय चेस्टची सीसीटीव्ही फुटेजही पाहिली जात आहे, असे अभिनंदन यांनी सांगितलं.




## एस्सल समूहाचे संचालक सुभाष चंद्रा यांना झटका!

प्रतिनिधी | १ सप्टेंबर

**दिल्ली** : राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरणाने मंगळवारी एस्सल समूहाचे संचालक सुभाष चंद्रा यांना मोठा झटका दिला. चंद्रा यांच्या वैयक्तिक दिवाळखोरीच्या प्रकरणात यापूर्वी २५ ऑगस्ट रोजी दिलेल्या आदेशाला स्थगिती दिली. तर हमीदार म्हणून त्यांनी आपली मालमत्ता प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षपणे अन्य कुणालाही हस्तांतरीत करू नये अथवा विकू नये, असे निर्देशही न्यायाधिकरणाने दिला आहे. यापूर्वीच्या तीन सदस्यांमध्ये मतभेद निर्माण झाले होते. आता हे प्रकरण एनसीएलटीच्या पाच सदस्यांच्या विशेष खंडपीठाकडे सोपवण्यात



आले आहे. आज सकाळी त्यावर सुनावणी झाली.

मंगळवारी विशेष खंडपीठाने त्यांचं मत नोंदवलं. यापूर्वीच्या आदेशामध्ये अंतर होते आणि कोणतेही स्पष्ट बहुमत नव्हते. त्यामुळे तो अंतिम आदेश नव्हता. न्यायाधिकरणाने याप्रकरणातील सर्व पक्षकारांना नोटीस बजावली आहे. २२,००० कोटींच्या कर्जमाफी प्रकरणात पहिल्यांदा ३ सप्टेंबर २०२५ रोजी दोन सदस्यांनी भिन्न निर्णय दिले होते. अशोक कुमार भारद्वाज यांनी सुभाष चंद्रा यांना ६.२५ कोटी कर्ज परतफेड योजनेला मंजुरी दिली होती. त्यावरून देशभरात मोठे वादंग उठले होते. बड्या उद्योजकांना देण्यात येत असलेल्या या विशेष सवलतीवर टीकेची झोड उठली होती. आता पाच सदस्यीय विशेष खंडपीठाने स्थगिती दिली आहे. विशेष खंडपीठासमोर या प्रकरणी पुन्हा सुनावणी होत आहे.

### कर्ज सेटलमेंटच्या आदेशाला स्थगिती!

#### झेडएमसीएलच्या शेअरमध्ये घसरण

या ताज्या निकालानंतर झेडएमसीएल, झी मीडिया कॉर्पोरेशन लिमिटेडच्या शेअरमध्ये मोठी घसरण दिसून आली. बीएसईच्या नवीन आकड्यांनुसार, झेडएमसीएलच्या शेअरमध्ये जवळपास एक टक्क्यांची घसरण दिसली. हा शेअर सकाळच्या सत्रात ८.५४ रुपयांवर ट्रेड करत होता. या व्यापारी सत्रादरम्यान कंपनीचा शेअर ८.३७ रुपयांच्या निच्चांकावर पोहचला. सोमवारच्या तुलनेत आज सकाळी हा शेअर ८.७० रुपयांच्या तेजीसह उघडला होता. तर एक दिवसापूर्वी हा शेअर ८.६१ रुपयांवर बंद झाला होता.

## तपासणीच्या बहाण्याने डॉक्टरचे तरुणीशी अश्लील वर्तन

प्रतिनिधी | १ सप्टेंबर

अकोला : शहरातील सिव्हील लाईन पोलीस स्टेशनच्या हद्दीत असलेल्या एका नामांकित दवाखान्यातील डॉक्टरने तपासणीच्या बहाण्याने नागपूरवरून आलेल्या तरूणीशी अश्लील वर्तन केल्याचा आरोप करण्यात आला आहे. विशेष म्हणजे सदर डॉक्टर हा भाजपच्या एका वैद्यकीय आघाडीचाही पदाधिकारी आहे. ही घटना २९ ऑगस्टला घडली असून, पोलिसांनी तांत्रिक माहितीच्या आधारे या ४६ वर्षीय डॉक्टरला अटक केली आहे. तक्रारीत फिर्यादीने म्हटल्यानुसार, तपासणी आणि चेहऱ्यावरील



केसांवर उपचार करण्याच्या बहाण्याने डॉक्टरने वेगवेगळ्या खोल्यांमध्ये नेले. यावेळी सदर डॉक्टरने अश्लील वर्तनाचा प्रयत्न केल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. औषध देण्याच्या बहाण्याने वैद्यकीय दुकानातही लज्जास्पद वर्तन केल्याचा आरोप आहे. युवतीने आई-वडिलांना हा प्रकार सांगितल्यानंतर कुटुंबीयांसह पोलिसांत धाव घेतली. बीएनएसचे कलम ७४ आणि ७५(१) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेमुळे रामनगर परिसरासह शहरात खळबळ उडाली आहे.

घटनेची माहिती मिळताच समाजातून रोष व्यक्त करण्यात येत असून, एका पक्षाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्याने संताप करीत आरोपी डॉक्टरला चांगलाच चोप दिल्याची चर्चा आहे. विशेष म्हणजे हा डॉक्टर भाजपच्या एका वैद्यकीय आघाडीचा पदाधिकारी असून यापूर्वीही अशाच प्रकारचे गैरवर्तन केल्याचा आरोप त्याच्यावर करण्यात आला होता.

# अकोला जिल्हा परिषदेच्या 912 शाळांतील विद्यार्थ्यांच्या सुरक्षेला 'ब्रेक'!

## CCTVचा ४.१० कोटींचा निधी शासनाकडे परत

प्रविण वानखडे | १ सप्टेंबर

अकोला : अकोला जिल्हा परिषदेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांची सुरक्षितता अधिक बळकट करण्यासाठी ९१२ शाळांमध्ये CCTV कॅमेरे बसविण्याचे नियोजन करण्यात आले होते. यासाठी तब्बल ४ कोटी १० लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला होता. मात्र, हा निधी निर्धारित वेळेत खर्च न झाल्याने अखेर शासनाकडे परत गेल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे निधी उपलब्ध असूनही विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी आवश्यक CCTV यंत्रणा उभारण्यात अकोला जिल्हा परिषद प्रशासनाला अपयश आल्याने शिक्षण विभागाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. शिक्षण विभागाच्या नियोजनानुसार अकोला जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये दोन मेगापिक्सल क्षमतेचे CCTV कॅमेरे बसविण्यात येणार होते. या कॅमेऱ्यांच्या माध्यमातून सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंतचे दृश्य टिपले जाणार होते. विद्यार्थ्यांची सुरक्षा, शाळेतील अनुचित प्रकारांना आळा घालणे तसेच शाळा परिसरातील हालचालींवर देखरेख ठेवण्याच्या दृष्टीने ही यंत्रणा महत्त्वाची ठरणार होती.

मात्र CCTV बसविण्याची प्रक्रिया वेळेत पूर्ण न झाल्याने मंजूर निधी खर्च करता आला नाही. परिणामी ४ कोटी १० लाख रुपयांचा निधी शासनाकडे परत गेल्याचे समोर आले आहे. एकीकडे विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी शासनाकडून मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून देण्यात आला, तर दुसरीकडे तो वेळेत खर्च न झाल्याने परत जाण्याची वेळ आली. त्यामुळे या निधीच्या अंमलबजावणीत नेमकी दिरंगाई कुठे झाली, असा सवाल उपस्थित होत आहे.

अकोला जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या हजारो विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न यामुळे ऐरणीवर आला आहे. CCTV यंत्रणा कार्यान्वित झाल्यास शाळेतील तसेच परिसरातील हालचालींवर लक्ष ठेवणे शक्य झाले असते. मात्र निधी परत गेल्याने आता CCTV कधी बसणार? पुन्हा निधी कधी मिळणार? आणि मिळालेला निधी यावेळी वेळेत खर्च होणार का? असे प्रश्न पालक आणि नागरिकांकडून उपस्थित होत आहेत.

### अंमलबजावणी कुठे अडली?

विद्यार्थ्यांच्या सुरक्षेशी संबंधित योजनेचा कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च न होता शासनाकडे परत जाण्याची वेळ का आली, याचा खुलासा अकोला जिल्हा परिषद प्रशासनाने करणे गरजेचे आहे. निधी वेळेत खर्च न होण्यास कोण जबाबदार आहे आणि या प्रकरणी संबंधितांवर कोणती कार्यवाही होणार, याकडे आता लक्ष लागले आहे.

## ठाकरेंचे 14 आमदार शिंदेसेनेत प्रवेश करणार!

**मुंबई :** महाराष्ट्राच्या राजकारणातली सगळ्यात मोठी माहिती समोर आली आहे. आगामी नवरात्रीच्या आधी शिवसेना ठाकरेंचे १४ आमदार शिंदेंच्या शिवसेनेत पक्ष प्रवेश करणार असल्याचा दावा शिवसेना शिंदे गटातील एका बड्या नेत्याने केला आहे. या १४ आमदारांना शिवसेनेत आणण्याची जबाबदारी तीन मंत्र्यांवर देण्यात आली आहे, अशी माहितीही शिंदेसेनेतील बड्या नेत्याने दिली आहे. सध्या उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेकडे एकूण २० आमदार आहेत. या २० आमदारांपैकी १४ आमदार शिवसेनेत प्रवेश करणार असल्याची माहिती मिळत आहे. त्यामुळे उद्धव ठाकरेंकडे असलेल्या २० आमदारांपैकी कोणते १४ आमदार शिंदे गटात प्रवेश करणार, याकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे. कोकण, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्रातील मंत्र्यांवर ऑपरेशन टायगरची जबाबदारी देण्यात आल्याची माहिती शिवसेना शिंदे गटातील बड्या नेत्याने दिली आहे. या १४ आमदारांपैकी ६ आमदारांना सरकारमध्ये चांगली खाती आणि मंत्रिपदे देण्यात येणार आहेत. यापैकी काहींची महामंडळ अध्यक्ष आणि राज्यमंत्रीपदी वर्णी लागण्यावर पक्षांतर्गत चर्चा अंतिम टप्प्यात पोहोचल्याची माहितीही समोर आली आहे




# एलआयसी भारतातील सर्वात मोठी विमा कंपनी

## ‘तुमची समृद्धी आमचे कर्तव्य’ आजच्या दिवशी झाली होती स्थापना

विम्याची कहाणी कदाचित मानवजातीच्या इतिहासाइतकीच जुनी आहे. आजच्या आधुनिक व्यावसायिकांना नुकसान आणि आपत्तींपासून स्वतःचे संरक्षण करण्यास प्रवृत्त करणारी तीच सहज प्रवृत्ती आदिमानवांमध्येही अस्तित्वात होती. तेसुद्धा आग, पूर आणि जीवितहानीचे दुष्परिणाम टाळण्याचा प्रयत्न करत असत आणि सुरक्षितता मिळवण्यासाठी काही प्रकारचे बलिदान देण्यास तयार होते. जरी विम्याची संकल्पना मोठ्या प्रमाणात अलीकडच्या काळातील, विशेषतः औद्योगिक युगानंतरचा - गेल्या काही शतकांतील - विकास असली तरी, तिची सुरुवात सुमारे ६००० वर्षांपूर्वीची आहे.

जीवन विमा त्याच्या आधुनिक स्वरूपात १८१८ साली इंग्लंडमधून भारतात आला. कलकत्त्यात युरोपियन लोकांनी सुरू केलेली 'ओरिएंटल लाइफ इन्शुरन्स कंपनी' ही भारतीय भूमीवरील पहिली जीवन विमा कंपनी होती. त्या काळात स्थापन झालेल्या सर्व विमा कंपन्या युरोपियन समुदायाच्या गरजा पूर्ण करण्याच्या उद्देशाने उभारल्या गेल्या होत्या आणि या कंपन्यांकडून भारतीय नागरिकांचा विमा उतरवला जात नव्हता. तथापि, नंतर बाबू मुत्तिलाल सील यांच्यासारख्या थोर व्यक्तींच्या प्रयत्नांमुळे, परदेशी जीवन विमा कंपन्यांनी भारतीय नागरिकांचा विमा उतरवण्यास सुरुवात केली. परंतु भारतीय नागरिकांना दुय्यम दर्जाचे मानले जात होते आणि त्यांच्याकडून मोठा अतिरिक्त हप्ता आकारला जात होता. बॉम्बे म्युच्युअल लाईफ अ‍ॅश्युरन्स सोसायटीने १८७० साली पहिल्या भारतीय जीवन विमा कंपनीचा जन्म केला आणि सामान्य दरात भारतीयांना विमा संरक्षण दिले. अत्यंत देशभक्तीच्या हेतूने एक भारतीय उपक्रम म्हणून सुरू झालेल्या विमा कंपन्या, समाजातील विविध स्तरांपर्यंत विम्याचा आणि त्याद्वारे सामाजिक सुरक्षेचा संदेश पोहोचवण्यासाठी अस्तित्वात आल्या. भारत इन्शुरन्स कंपनी (१८९६) ही देखील राष्ट्रवादाने प्रेरित अशाच कंपन्यांपैकी एक होती. १९०५-१९०७ च्या स्वदेशी चळवळीमुळे अधिक विमा कंपन्या उदयास आल्या. १९०६ मध्ये मद्रासमध्ये युनायटेड इंडिया, कलकत्त्यामध्ये नॅशनल इंडियन आणि नॅशनल इन्शुरन्स आणि लाहोरमध्ये को-ऑपरेटिव्ह अ‍ॅश्युरन्स यांची स्थापना झाली. १९०७ मध्ये, कलकत्त्यातील महान कवी रवींद्रनाथ टागोर यांच्या जोरासांको येथील घराच्या एका खोलीत हिंदुस्तान को-ऑपरेटिव्ह इन्शुरन्स कंपनीचा जन्म झाला. इंडियन मर्कंटाईल, जनरल अ‍ॅश्युरन्स आणि स्वदेशी लाईफ (नंतर बॉम्बे लाईफ) या त्याच काळात स्थापन झालेल्या काही कंपन्या होत्या. १९१२ पूर्वी भारतात विमा व्यवसायाचे नियमन करण्यासाठी कोणताही कायदा नव्हता. १९१२ साली जीवन विमा कंपन्या कायदा आणि भविष्य निर्वाह निधी कायदा संमत करण्यात आले. जीवन विमा कंपन्या कायदा, १९१२ नुसार कंपन्यांच्या प्रीमियम दर सारण्या आणि नियतकालिक मूल्यांकनांना एका विमातज्ञाकडून प्रमाणित करणे आवश्यक झाले. परंतु या कायद्याने अनेक बाबींवर परदेशी आणि भारतीय कंपन्यांमध्ये भेदभाव केला, ज्यामुळे भारतीय कंपन्या तोट्यात आल्या.

विसाव्या शतकाच्या पहिल्या दोन दशकांत विमा व्यवसायात मोठी वाढ झाली. एकूण २२.४४ कोटी रुपयांचा व्यवसाय असलेल्या ४४ कंपन्यांपासून, १९३८ मध्ये हा व्यवसाय वाढून १७६ कंपन्या आणि २९८ कोटी रुपयांचा व्यवसाय झाला. विमा कंपन्यांच्या या वाढीदरम्यान अनेक आर्थिकदृष्ट्या कमकुवत कंपन्याही सुरू झाल्या, ज्या पूर्णपणे अयशस्वी ठरल्या. विमा व्यवसायावर कठोर शासकीय नियंत्रण ठेवण्यासाठी, विमा कायदा १९३८ हा केवळ जीवन विमाच नव्हे, तर गैर-जीवन विमा क्षेत्राचेही नियमन करणारा पहिला कायदा होता. जीवन विमा उद्योगाच्या राष्ट्रीयीकरणाची मागणी पूर्वी वारंवार करण्यात आली होती, परंतु १९४४ मध्ये विधानसभेत जीवन विमा कायदा १९३८ मध्ये सुधारणा करणारे विधेयक सादर झाल्यावर या मागणीला अधिक जोर मिळाला. तथापि, खूप नंतर, १९ जानेवारी १९५६ रोजी, भारतातील जीवन विम्याचे राष्ट्रीयीकरण झाले. राष्ट्रीयीकरणाच्या वेळी भारतात सुमारे १५४ भारतीय विमा कंपन्या, १६ गैर-भारतीय कंपन्या आणि ७५ भविष्य निर्वाह निधी कार्यरत होते. राष्ट्रीयीकरण दोन टप्प्यांत पूर्ण करण्यात आले; सुरुवातीला एका अध्यादेशाद्वारे कंपन्यांचे व्यवस्थापन ताब्यात घेण्यात आले आणि नंतर एका सर्वसमावेशक विधेयकाद्वारे मालकी हक्कही ताब्यात घेण्यात आला. भारताच्या संसदेने १९ जून १९५६ रोजी जीवन विमा महामंडळ कायदा मंजूर केला आणि देशातील सर्व विमापात्र व्यक्तींपर्यंत पोहोचून त्यांना वाजवी दरात पुरेसे आर्थिक संरक्षण प्रदान करण्याच्या उद्देशाने, जीवन विम्याचा अधिक व्यापकपणे आणि विशेषतः ग्रामीण भागात प्रसार करण्याच्या हेतूने १ सप्टेंबर १९५६ रोजी भारतीय जीवन विमा महामंडळाची स्थापना करण्यात आली.

१९५६ साली जीवन विमा महामंडळाची मुख्य कार्यालयाव्यतिरिक्त ५ विभागीय कार्यालये, ३३ विभागीय कार्यालये आणि २१२ शाखा कार्यालये होती. जीवन विमा करार हे दीर्घकालीन करार असल्याने आणि पॉलिसीच्या कालावधीत विविध सेवांची आवश्यकता असल्याने, नंतरच्या काळात कामकाजाचा विस्तार करण्याची आणि प्रत्येक जिल्हा मुख्यालयात एक शाखा कार्यालय स्थापन करण्याची गरज भासली. जीवन विमा महामंडळाची पुनर्रचना झाली आणि मोठ्या संख्येने नवीन शाखा कार्यालये उघडण्यात आली. पुनर्रचनेच्या परिणामी, सेवाविषयक कार्ये शाखांकडे हस्तांतरित करण्यात आली आणि शाखांना लेखांकन एकके बनवण्यात आले. याचा महामंडळाच्या कामगिरीवर आश्चर्यकारक परिणाम झाला. हे दिसून येते की, १९५७ मध्ये सुमारे २००.०० कोटी रुपयांचा नवीन व्यवसाय असताना, महामंडळाने १९६९-७० या वर्षातच १०००.०० कोटी रुपयांचा टप्पा ओलांडला आणि आयुर्विमा महामंडळाला २०००.०० कोटी रुपयांचा नवीन व्यवसायाचा टप्पा ओलांडण्यासाठी आणखी १० वर्षे लागली. परंतु ऐंशीच्या दशकाच्या सुरुवातीला झालेल्या पुनर्रचनेमुळे, १९८५-८६ पर्यंत आयुर्विमा महामंडळाने नवीन पॉलिसींवरील विमा रक्कम ७०००.०० कोटी रुपयांचा टप्पा आधीच ओलांडला होता.

आज भारतीय आयुर्विमा महामंडळ २०४८ पूर्णपणे संगणकीकृत शाखा कार्यालये, ११३ विभागीय कार्यालये, ८ विभागीय कार्यालये, १३८१ उपग्रह कार्यालये आणि कॉर्पोरेट कार्यालयासह कार्यरत आहे. भारतीय आयुर्विमा महामंडळाचे वाइड एरिया नेटवर्क ११३ विभागीय कार्यालयांना व्यापते आणि मेट्रो एरिया नेटवर्कद्वारे सर्व शाखांना जोडते. भारतीय आयुर्विमा महामंडळाने निवडक शहरांमध्ये ऑनलाईन प्रीमियम संकलन सुविधा देण्यासाठी काही बँका आणि सेवा प्रदात्यांशी करार केला आहे. भारतीय आयुर्विमा महामंडळाची ईसीएस आणि एटीएम प्रीमियम भरण्याची सुविधा ही ग्राहकांच्या सोयीसाठी एक अतिरिक्त सुविधा आहे. ऑनलाईन किऑस्क आणि आयव्हीआरएस व्यतिरिक्त, मुंबई, अहमदाबाद, बंगळूर, चेन्नई, हैदराबाद, कोलकाता, नवी दिल्ली, पुणे आणि इतर अनेक शहरांमध्ये माहिती केंद्रे सुरू करण्यात आली आहेत. आपल्या पॉलिसीधारकांना सहज उपलब्धता प्रदान करण्याच्या दृष्टिकोनातून, भारतीय आयुर्विमा महामंडळाने आपली उपग्रह संपर्क कार्यालये (सॅटेलाइट संपर्क ऑफिसेस) सुरू केली आहेत. ही उपग्रह कार्यालये लहान, अधिक कार्यक्षम आणि ग्राहकांच्या अधिक जवळ आहेत. उपग्रह कार्यालयांमधील डिजिटल नोंदींमुळे भविष्यात कोठूनही सेवा (एनीव्हेअर सर्व्हिसिंग) आणि इतर अनेक सोयीसुविधा उपलब्ध होतील.

भारतीय विमा क्षेत्रातील उदारीकरणाच्या काळातही, जीवन विमा महामंडळ ही एक प्रमुख जीवन विमा कंपनी म्हणून कायम आहे आणि स्वतःचेच मागील विक्रम मोडून विकासाच्या नव्या मार्गावर वेगाने वाटचाल करत आहे. जीवन विमा महामंडळाने चालू वर्षात एक कोटींहून अधिक पॉलिसी जारी केल्या आहेत. १५ ऑक्टोबर २००५ पर्यंत १,०१,३२,९५५ नवीन पॉलिसी जारी करण्याचा टप्पा ओलांडून, मागील वर्षाच्या याच कालावधीच्या तुलनेत १६.६७ टक्केचा उत्तम वाढीचा दर नोंदवला आहे. तेव्हापासून आतापर्यंत, जीवन विमा महामंडळाने अनेक टप्पे पार केले आहेत आणि जीवन विमा व्यवसायाच्या विविध पैलूंमध्ये अभूतपूर्व कामगिरीचे विक्रम प्रस्थापित केले आहेत. ज्या हेतूंनी आपल्या पूर्वजांना या देशात विमा अस्तित्वात आणण्यास प्रेरित केले, त्याच हेतूंनी आम्हाला जीवन विमा महामंडळात संरक्षणाचा हा संदेश शक्य तितक्या घरांमध्ये सुरक्षेचे दिवे लावण्यासाठी आणि लोकांना त्यांच्या कुटुंबांना सुरक्षा प्रदान करण्यास मदत करण्यासाठी प्रेरित केले आहे.

# ‘नाही’ म्हणायला शिका; नकारातूनच सकारात्मकतेची वाट खुलते!

कधी कधी एखादी घटना केवळ बातमी राहत नाही; ती आपल्या अंतर्मनाला हादरवून सोडणारा प्रश्न बनते. महाराष्ट्रातील छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात अलीकडे घडलेली एका कुटुंबाच्या अंताची हृदयद्रावक घटना अशीच आहे. मोबाईलच्या हप्त्यावरून वडील आणि १९ वर्षीय मुलामध्ये निर्माण झालेले मतभेद टोकाला गेले. मुलगा आत्महत्या करण्यासाठी डोंगराच्या कड्यावर गेला. त्याला वाचविण्यासाठी गेलेले वडील मुलासह कड्यावरून कोसळले आणि डोळ्यांसमोर पती व मुलगा खाली पडल्याचे पाहून आईनेही उडी घेतली. काही क्षणांत एक अख्खे कुटुंब काळाच्या पडद्याआड गेले.

मोबाईल या घटनेचा निमित्तमात्र घटक असू शकतो; परंतु प्रश्न मोबाईलपुरता मर्यादित नाही. प्रश्न आहे तो संवादाचा, संयमाचा, नात्यांतील विश्वासाचा, अपेक्षांचा आणि ‘नाही’ स्वीकारण्याच्या मानसिक क्षमतेचा! क्षणिक संताप, हट्ट, अहंकार किंवा अविचार एखाद्या व्यक्तीचे नव्हे, तर संपूर्ण कुटुंबाचे आयुष्य उद्ध्वस्त करू शकतो, याची ही घटना काळीज पिळवटून टाकणारी जाणीव करून देते.

मोबाईल साधन आहे; जीवनाचा स्वामी नव्हे!

एकविसाव्या शतकाने माणसाला तंत्रज्ञानाची अद्भुत साधने दिली. मोबाईल, इंटरनेट, सोशल मीडिया, ऑनलाइन शिक्षण, मनोरंजन, माहितीचे महासागर आज जग अक्षरशः हाताच्या तळव्यावर आले आहे. मोबाईल हा ज्ञानाचा खजिना ठरू शकतो; परंतु तोच अतिरेकाने वापरला तर मानसिक गुलामगिरीची बेडीही ठरू शकतो.

आज घरात माणसे चार-पाच असली तरी प्रत्येकाचे लक्ष वेगवेगळ्या पडद्यावर खिळलेले दिसते. पूर्वी घरातील ज्येष्ठ व्यक्तीशी संवाद व्हायचा, अंगणात खेळ व्हायचे, मित्रमैत्रिणींच्या गप्पा रंगायच्या; आता अनेकदा घरात शांतता असते.पण प्रत्येकाच्या हातात मोबाईल असतो!

घरात मोबाईल वाढला आणि संवाद कमी झाला, तर तंत्रज्ञानाची प्रगती असूनही माणुसकीची अधोगती सुरू होते. मुलांना शांत ठेवण्यासाठी मोबाईल देणे, जेवताना मोबाईल देणे, रडू नये म्हणून मोबाईल देणे, अभ्यासाच्या नावाखाली अनियंत्रित इंटरनेट वापरू देणे ही सवय सुरुवातीला सोयीची वाटते. परंतु हळूहळू तीच सवय गरज बनते आणि गरज पुढे व्यसनाचे रूप धारण करू शकते.मुलांना प्रत्येक गोष्टीसाठी ‘हो’ म्हणणे म्हणजे प्रेम नव्हे!

पालकांचे आपल्या मुलांवर प्रेम असते, यात शंका नाही. आपल्या मुलाला आपल्यापेक्षा चांगले जीवन मिळावे, त्याला कोणत्याही गोष्टीची कमतरता भासू नये, अशी प्रत्येक आई-वडिलांची इच्छा असते. पण प्रेमाच्या अतिरेकातून जर मुलांच्या प्रत्येक मागणीला होकार मिळत असेल, तर नकळत आपण त्यांच्या मानसिक कणखरतेला कमकुवत करीत असतो.

मुलाला प्रत्येक वेळी ‘हो’ मिळत राहिला, तर आयुष्यातील पहिला ‘नाही’ त्याला असह्य होऊ शकतो. म्हणूनच मुलांना कधी कधी प्रेमाने, समजावून आणि ठामपणे ‘नाही’ म्हणणे आवश्यक आहे. चॉकलेट हवे म्हणून रडणाऱ्या मुलाला प्रत्येक वेळी चॉकलेट मिळालेच पाहिजे असे नाही. महागडा मोबाईल हवा म्हणून लगेच मोबाईल घेतला पाहिजे असे नाही. मित्रांकडे आहे म्हणून आपल्या मुलाकडेही असलेच पाहिजे, हा पालकांचा नियम असू नये. मुलाने एखादी वस्तू मागितली आणि पालकांनी ती देण्यास नकार दिला, तर मुलाला निराशा होईल. राग येईल. कदाचित तो रडेलही. पण त्या छोट्या निराशेतूनच तो आयुष्यातील मोठ्या संघर्षांना सामोरे जाण्याची ताकद शिकू शकतो.



श्री. पुरुषोत्तम काळबांडे
विठ्ठल नगर, नागपूर
संवाद - 9403341432

# श्री तिरुमला सात पवित्र पर्वतांचे क्षेत्र



तिरुमला हे सप्तगिरी म्हणजेच सात पवित्र पर्वतांचे क्षेत्र म्हणून ओळखले जाते. धार्मिक परंपरेनुसार हे सात पर्वत आदिशेषाच्या सात फण्यांशी संबंधित मानले जातात. म्हणूनच तिरुमलाला शेषाचलम् असेही म्हटले जाते.

**हे सात पर्वत कोणते?**

1. **शेषाद्री** — आदिशेषाशी संबंधित पर्वत
2. **नीलाद्री** — नीलादेवीशी संबंधित
3. **गरुडाद्री** — भगवान विष्णूंचे वाहन गरुड यांच्याशी संबंधित
4. **अंजनाद्री** — अंजना देवीशी संबंधित
5. **वृषभाद्री** — वृषभासुराशी संबंधित
6. **नारायणाद्री** — भगवान नारायणाशी संबंधित
7. **वेंकटाद्री** — श्री वेंकटेश्वर स्वामींचे मुख्य निवासस्थान मानले जाणारे पर्वत वेंकटाद्रीचे विशेष महत्त्व. या सात पर्वतांपैकी वेंकटाद्री सर्वात महत्त्वाचा मानला जातो, कारण याच ठिकाणी भगवान श्री वेंकटेश्वरांचे मुख्य मंदिर आहे.

तिरुमलाच्या धार्मिक आख्यायिकेनुसार, भगवान विष्णूंनी कलियुगातील भक्तांचे कल्याण करण्यासाठी श्रीनिवास/वेंकटेश्वर रूपात येथे निवास केला.

पौराणिक परंपरेत आदिशेष आणि वायुदेव यांच्यात झालेल्या सामर्थ्याच्या प्रसंगाशी या पर्वतांची कथा जोडली जाते. आदिशेषाने मेरू पर्वताचा एक भाग आपल्या फण्यांनी वेढला आणि वायुदेवाने तो हटवण्याचा प्रयत्न केला. या प्रसंगातून पर्वताचा भाग पृथ्वीवर आला आणि त्याचा संबंध पुढे तिरुमलाच्या सप्तगिरीशी जोडला जातो.

ही पौराणिक आख्यायिका आहे; तिला आधुनिक भूगोलाचा ऐतिहासिक पुरावा समजू नये. तिरुमला म्हणजे फक्त एक मंदिर नाही. सात पर्वत, अनेक तीर्थे, मंदिरे आणि धार्मिक परंपरा मिळून संपूर्ण तिरुमला क्षेत्र तयार होते. म्हणून भक्त जेव्हा म्हणतात “गोविंदा! गोविंदा!” तेव्हा ते केवळ मंदिरातील देवतेला नव्हे, तर या संपूर्ण पवित्र वेंकटाचल क्षेत्राला श्रद्धेने वंदन करत असतात.

# अन्न हवा पाणी प्रदूषणामुळे हॉस्पीटल वाढले

देशामध्ये हॉस्पिटलची संख्या प्रचंड प्रमाणात वाढत आहे. याचे मुख्य कारण आहे आज आपलं पाणी अन्न, हवा, हे सर्वच बिघडलेल आहे, म्हणजेच प्रदूषित आहे.

सर्वात जास्त आपल्या शरीरात पाणी असतं. पाणी कोणतं पिलं पाहिजे?कस पिल पाहिजे? याबाबत ज्ञानाची कमतरता सर्वत्र पाहायला मिळत आहे. #मनुष्यप्राणीजिवंतआहेवत्यालाजिवंतपाण्याचीआवश्यकताआहे. परंतु आज सर्वत्र #केमिकलयुक्तपाणी प्यायला आणि वापरायला मिळत आहे. सर्व मोठ्या शहरांपासून, लहान शहरात, गावापर्यंत वॉटर ट्रीटमेंट प्लांट्स लागलेले आहेत.

या वॉटर ट्रीटमेंट प्लांट्स मध्ये एलम, ब्लिचिंग व क्लोरीनेशन हे प्रोसेस करून आपल्याला पाणी घरी पाठविला जात आहे. हे पाणी मेलेलं पाणी आहे किंवा डेड वॉटर आहे. असं म्हणायला हरकत नाही. पाण्यामुळे च रोगराई होत असते. पाणी जर जिवंत असेल तर रोगराई चे प्रमाण कमी होते.

आता तर अनेकांच्या घरात आरो प्लांट्स लागलेले आहेत ते अधिक घातक आहे. या संदर्भात #एनजीटी (नॅशनल ग्रीन ट्रिब्युनल)ने लोकांना सतर्क केले आहे.

तसेच #डब्ल्यूएचओ ने आरो प्लांट्स वापरू नये. व त्याचे पाणी घातक आहे. तरी ते वापरू नये, असे स्पष्ट सांगितले आहे. आता ते नॅचरल वॉटर प्या असं सांगत आहे. आता नॅचरल वॉटर मिळण्यासाठी भारतीय शास्त्रज्ञांनी बेरी (BERI) या संस्थेच्या माध्यमातून #बायोसॅनिटायझरइकोचीप या टेक्नॉलॉजीचा साह्याने जी नॅनोटेक्नॉलॉजी आहे. व आयुष्यात एकदाच वापरायच आहे. अशा टेक्नॉलॉजी च्या साह्याने आपण आपल्या घरचे पाणी, विहिरीचे पाणी, बोरवेलचे पाणी, जैविक म्हणजेच ऑक्सीजन युक्त म्हणजेच अल्कलाइन करून घेऊ शकता. इतकं ते सोपी आहे. तरी आपलं पाणी आपण आपल्या घरचे दुरुस्त करून घ्यावे व अधिक चौकशीसाठी # ओलावाफाउंडेशन ला संपर्क करावा. 9422112420

# संपादक, समाजसुधारक, स्त्रीशिक्षणाचे पुरस्कर्ते न्या. तेलंग!

## काशिनाथ तेलंग यांचा आज स्मृतिदिन

काशिनाथ त्र्यंबक तेलंग हे ब्रिटिश भारतातील न्यायाधीश, मराठी लेखक-संपादक, सुधारक, अखिल भारतीय काँग्रेसचे चिटणीस होते. इ.स. १८८९ साली तेलंग मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायाधीश झाले तर इ.स. १८९२ साली मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू झाले.

काशिनाथ तेलंग यांचा जन्म ३० ऑगस्ट १८५० रोजी गोकुळाष्टमीच्या दिवशी एका मध्यमवर्गीय सारस्वत ब्राह्मण कुटुंबात झाला. काशिनाथ यांच्या जन्मदात्या वडिलांचे नाव बापूभाई होते. त्यांना कृष्णराव व काशिनाथ ही दोन मुले होती. परंतु बापूभाई यांच्या मोठ्या बंधूंना-त्र्यंबक तेलंग यांनी मूलबाळ नव्हते. म्हणून त्यांनी काशिनाथ यांना दत्तक घेतले. वयाची पाच वर्षे पूर्ण झाल्यानंतर काशिनाथ एका स्थानिक शाळेत जाऊ लागले. ते सुरुवातीला दिनकरपंत दाते यांच्या व नंतर महादेव पंतोजी यांच्या शाळेत जाऊ लागले. लहानपणापासूनच ते हुशार विद्यार्थी होते. काशिनाथ यांचे मराठी शिक्षण पूर्ण झाल्यावर ते नवव्या वर्षी एलफिन्स्टन हायस्कूलमध्ये इंग्रजी विषय शिकण्यासाठी जाऊ लागले. शालेय जीवनात शैक्षणिक पुस्तकांशिवाय ते अवांतर पुस्तके देखील वाचत असत.

इ.स. १८६१ मध्ये मिडल स्कूलच्या परीक्षेत, इंग्लिश भाषेत त्यांनी प्रावीण्य मिळवले. त्यांची हुशारी पाहून मुख्याध्यापक एडमंड बर्क यांनी काशिनाथ यांना इंग्रजी तिसरीतून पाचवीच्या वर्गात चढवले. शालेय जीवनातच त्यांना मराठी कवितेची गोडी लागली. संस्कृत शिकण्यासाठी ते व त्यांचे वर्गमित्र श्रीपाद ठाकूर यज्ञेश्वर चिमणाजी शास्त्री सुरतकर यांच्याकडे जाऊ लागले. शाळेत इंग्रजी व संस्कृत हे दोन विषय त्यांचे उत्तम होते. १८६४ साली काशिनाथ संस्कृत विषय घेऊन मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाले. संस्कृत ही भाषा घेऊन मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झालेले काशिनाथ व श्रीपाद ठाकूर हे पहिले विद्यार्थी होते. एल्फिन्स्टन हायस्कूलचे तत्कालीन मुख्याध्यापक मिस्टर जेप्रॅसन यांनी काशिनाथांना मॅक्स मुल्लरचे 'संस्कृत वाङ्मयाचा इतिहास' हे पुस्तक बक्षीस म्हणून दिले.

१८६५मध्ये पुढील शिक्षणासाठी काशिनाथ एल्फिन्स्टन महाविद्यालयात जाऊन लागले. पहिल्याच वर्षी त्यांना जुनियर स्कॉलरशिप व त्याच्या पुढच्या वर्षी त्यांना सिनियर स्कॉलरशिप मिळू लागली. १८६७ मध्ये ते बी.ए.ची परीक्षा उत्तीर्ण झाले व १८६९मध्ये इंग्रजी व संस्कृत विषय घेऊन एम.ए. झाले. याच वर्षी ते एल.एल.बी.ची परीक्षा देखील उत्तीर्ण झाले. १८६८ मध्ये काशिनाथ तेलंग एल्फिन्सटन शाळेत संस्कृत शिक्षकाची नोकरी करू लागले. पण त्यांच्या वरिष्ठांनी लवकरच त्यांची नेमणूक एल्फिन्सटन महाविद्यालयात केली. तिथे काम करत असतानाच ते मुंबई उच्च न्यायालयाच्या वकिलीच्या परीक्षेची तयारी करत होते. १८७२ मध्ये ते वकिलीची परीक्षा उत्तीर्ण झाले व मुंबई उच्च न्यायालयात वकिली व्यवसायाला सुरुवात केली. १८७२-७३ साली तेलंग यांचे 'रामायण-होमर' व 'गीता-बायबल' या विषयांवरील निबंध प्रसिद्ध झाले.



१८८० मध्ये मुख्य न्यायाधीशांच्या शिफारशीवरून तेलंग यांना ठाणे येथे सह-न्यायाधीशाची जागा देण्यात आली होती पण त्यांनी ती नाकारली. तेलंग यांना संस्कृत भाषेचे उत्तम ज्ञान होते. त्यामुळे न्यायालयात वकिली करताना विशेषतः हिंदू कायद्या संदर्भात याचा त्यांना फायदा झाला.

१८८९मध्ये न्यायाधीश नानाभाई हरिदास यांच्या निधनामुळे न्यायाधीशाचे पद रिक्त झाले व त्या पदावर काशिनाथ तेलंग यांनी नियुक्ती झाली. मुंबई उच्च न्यायालयाचे ते ३४ वे न्यायाधीश होते. स्त्रीशिक्षण, विधवाविवाह सुधारणांचे ते पुरस्कर्ते होते. त्या दृष्टीने त्यांनी हिंदू कायद्यात सुधारणा केल्या.

१८७२मध्ये त्यांना मुंबई विद्यापीठाच्या बी.ए.च्या संस्कृत विषयाच्या परीक्षक म्हणून नेमले गेले. इ.स. १८७७मध्ये त्यांची मुंबई विद्यापीठाच्या फेलोच्या जागी नेमण्यात आले. इ.स. १८८२मध्ये ते मुंबई विद्यापीठाचे सिंडिक झाले. या पदावर ते दहा वर्षे राहिले व इ.स. १८९२ मध्ये त्यांची सरकारने मुंबई विद्यापीठाच्या कुलगुरू पदी नियुक्ती केली. १८८२मध्ये लॉर्ड रिपन याने एज्युकेशन कमशिनची नेमणूक केली. काशिनाथ तेलंग ह्या कमिशनचे सभासद होते. तेलंग दर महिन्याला मुंबईत राहणाऱ्या सुमारे ३०० गरीब विद्यार्थ्यांना फी किंवा पुस्तकं अथवा खानावळीचे पैसे देण्यासाठी आर्थिक मदत करत असत. इ.स. १८९२मध्ये दादर येथे स्थापन झालेल्या 'द जनरल एज्युकेशन इन्स्टिट्यूट' या शिक्षणसंस्थेचे तेलंग संस्थापक सदस्य होते. पुण्यात विष्णूशास्त्री चिपळूणकर यांनी स्थापन केलेल्या 'न्यू इंग्लिश स्कूल'ला रसायनशास्त्राच्या उपकरणांकरिता तेलंग यांनी ५० रुपये मदत केली होती. १८८४ मध्ये 'न्यू इंग्लिश स्कूल'च्या 'डेक्कन एज्युकेशन सोसायटी'च्या स्थापनेवेळी १००० रुपये भरून तेलंग त्या संस्थेचे पेट्रन (आश्रयदाता) झाले. त्याचप्रमाणे त्यांची संस्थेच्या सल्लागार समितीत निवड झाली. १८८४ पासून ते निधनापर्यंत (१८९३) तेलंग सल्लागार समितीचे सदस्य होते. मुंबईतील 'नेटिव्ह जनरल लायब्ररी' या वाचनालयाचे तेलंग अनेक वर्षे अध्यक्ष होते. मुंबईच्या एशियाटिक सोसायटीचे ते इ.स. १८७४पासून अखेरपर्यंत सभासद होते. इ.स. १८९३साली एशियाटिक सोसायटीच्या अध्यक्षपदी तेलंग यांची निवड करण्यात आली. मुंबईच्या एशियाटिक सोसायटीचे तेलंग हे पहिले भारतीय अध्यक्ष होते.

भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या स्थापनेत तेलंग यांचे योगदान होते. काँग्रेसच्या पहिल्या तीन अधिवेशनाला प्रकृती अस्वास्थ्यामुळे ते हजर राहू शकले नाहीत. १८८४ मध्ये अलाहाबाद येथील राष्ट्रीय सभेच्या चौथ्या अधिवेशनाला ते हजर होते. त्यांनी कायदे मंडळाच्या सुधारणे संबंधातील ठराव सभेपुढे मांडला. १८८९मध्ये मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायाधीश पदी नेमणूक झाल्याने ते त्या वर्षीच्या राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनाला प्रतिनिधी म्हणून उपस्थित न राहता प्रेक्षक म्हणून उपस्थित राहिले. इ.स. १८९२ पासूनच तेलंग यांची प्रकृती बरी नव्हती. मोडाच्या दुखण्याचा आजार बळावल्यामुळे १ सप्टेंबर १८९३ रोजी तेलंग यांचे वयाच्या त्रेचाळीसाव्या वर्षी निधन झाले.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड
मंगळवार, दि.१ सप्टेंबर २०२६ Web. http://epaper:citynewssuperfast.com


# बिल्डरांकडून नुकसान भरपाई आता होईल जलद

## निवासी जिल्हाधिकाऱ्यांच्या निगराणीत होणार वसुली

प्रतिनिधी १ सप्टेंबर

**अकोला:** घर खरेदीदारांच्या प्रलंबित नुकसान भरपाईच्या रकमेची वसुली आता अधिक जलद होईल. वसुली वॉरंट आणि थकबाकीची वसुली प्रक्रिया सुव्यवस्थित करण्यासाठी, महाराष्ट्र स्थावर मालमत्ता नियामक प्राधिकरणाने (महारेरा) एका समर्पित महसूल वसुली अधिकाऱ्याची जबाबदारी निवासी उपविभागीय जिल्हाधिकाऱ्यांकडे सोपवली आहे.



आता, निवासी उपविभागीय दंडाधिकारी वसुली वॉरंट जारी करण्यापासून ते बिल्डरांकडून थकबाकी वसूल करण्यापर्यंतच्या संपूर्ण प्रक्रियेवर थेट देखरेख ठेवतील. या कठोर उपाययोजनेअंतर्गत, थकबाकीदार बिल्डरांची मालमत्ता जप्त केली जाईल.

मालमत्ता नियमांनुसार जप्त करून त्यांचा लिलाव केला जाईल. लिलावातून मिळालेली रक्कम थेट संबंधित घर खरेदीदारांना नुकसान भरपाई म्हणून वितरित केली जाईल, ज्यामुळे अनेक वर्षांपासून दिलासा मिळण्याची वाट पाहणाऱ्या खरेदीदारांना मोठा दिलासा मिळेल. महारेराचे ६०० कोटी रुपयांहून अधिक किमतीचे नुकसान भरपाईचे आदेश अद्याप प्रलंबित आहेत. खरेदीदारांना त्यांचे पैसे मिळवण्यासाठी वर्षानुवर्षे वाट पाहावी लागत आहे. त्यामुळे नवीन प्रणाली महारेराच्या आदेशापासून ते खरेदीदाराला पैसे मिळेपर्यंतची प्रक्रिया जलद करण्यावर लक्ष केंद्रित करेल.

### आदेशाचे पालन न केल्यास, होईल मालमत्ता जप्त..

जर खरेदीदाराविरुद्ध फसवणुकीची तक्रार खरी असल्याचे आढळले, तर महारेरा बिल्डरला व्याजासह रक्कम परत करण्याचा आदेश देते. जर आदेशाचे पालन केले नाही, तर वसुली वॉरंट जारी केले जाते. त्यानंतर जिल्हा प्रशासनामार्फत वसुली केली जाते. नवीन बदलांनुसार, आता, निवासी उपविभागीय दंडाधिकारी प्रलंबित वसुली प्रकरणांचा नियमितपणे आढावा घेतील. कार्यवाहीवरील प्रगती अहवाल वरिष्ठ अधिकाऱ्यांना सादर केले जातील. यामुळे अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या प्रकरणांमध्ये जबाबदारी निश्चित होण्यास आणि वसुलीला गती मिळण्यास मदत होईल अशी अपेक्षा आहे. याव्यतिरिक्त, थकबाकीदार बिल्डरांच्या मालमत्ता नियमांनुसार जप्त करून त्यांचा लिलाव केला जाईल. लिलावातून मिळालेली रक्कम संबंधित खरेदीदारांना नुकसान भरपाई म्हणून वितरित केली जाईल.

# राजराजेश्वराला तिरुपती बालाजीचा श्रृंगार



प्रतिनिधी १ सप्टेंबर

**अकोला :** श्रावण सोमवार आणि संकष्टी चतुर्थीच्या निमित्ताने अकोला शहराचे आराध्य दैवत श्री राजराजेश्वर महाराजांचा तिरुपती बालाजी रूपात मनमोहक श्रृंगार करण्यात आला.

आकर्षक फुलांची सजावट, अलंकार आणि पारंपरिक पद्धतीने करण्यात आलेल्या या श्रृंगाराने मंदिरातील वातावरण भक्तिमय झाले होते. श्रावण सोमवार असल्याने सकाळपासूनच श्री राजराजेश्वर महाराजांच्या दर्शनासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती.

तिरुपती बालाजी रूपातील मनमोहक मूर्तीचे दर्शन घेण्यासाठी शहरासह परिसरातील भाविक मंदिरात दाखल झाले. दिवसभर मंदिर परिसरात भक्तिमय वातावरण होते. सायंकाळनंतर भाविकांची गर्दी आणखी वाढली. कुटुंबासह तसेच मित्रपरिवारासोबत भाविकांनी मंदिरात येऊन श्री राजराजेश्वर महाराजांचे दर्शन घेतले. विशेष श्रृंगाराचे दर्शन घेण्यासाठी सोमवारी रात्री उशिरापर्यंत भाविकांची रांग लागली होती.

श्रावण महिन्यातील सोमवार आणि संकष्टी चतुर्थीचा योग साधत करण्यात आलेल्या या विशेष श्रृंगारामुळे भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले. रात्री उशिरापर्यंत सुरू असलेल्या दर्शनामुळे मंदिर परिसरात भक्तीमय वातावरण अनुभवायला मिळाले.

# रुस्तमपूर परिसरात अवैध दारूचा अड्डा?

प्रतिनिधी १ सप्टेंबर

**रुस्तमपूर :** यवदा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील रुस्तमपूर परिसरात अवैध दारू विक्रीचा सुळसुळाट झाल्याचा आरोप ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे. म्हैसाग आणि रुस्तमपूर या दोन गावांच्या मध्यभागी असलेल्या नदीकाठच्या परिसराचा गैरफायदा घेत दारूची विक्री सुरू असल्याची चर्चा परिसरात जोर धरत आहे.स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, 'वासुधरा ढाबा' परिसरासह नदीकाठच्या भागात देशी-विदेशी तसेच हातभट्टीच्या दारूची विक्री होत असल्याचे आरोप केले जात आहेत. या ठिकाणी दारू पिणाऱ्यांची गर्दी होत असल्याने नागरिक, महिला आणि तरुणांना त्रास सहन करावा लागत असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. विशेष म्हणजे, दारू विक्री होत असल्याचा दावा करण्यात येत असलेले काही व्हिडिओही समोर आले आहेत. या व्हिडिओमध्ये दारूची विक्री होत असल्याचे दृश्य दिसत असल्याचा दावा करण्यात येत आहे. मात्र या व्हिडिओंची अधिकृत पडताळणी अथवा त्यातील व्यक्तींची ओळख अद्याप अधिकृतपणे स्पष्ट झालेली नाही. दोन गावांच्या सीमेवर आणि नदीकाठच्या भागात हा प्रकार सुरू असल्याने कारवाईची जबाबदारी नेमकी कोणाची? असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. पोलीस प्रशासन आणि राज्य उत्पादन शुल्क विभागाने या परिसराकडे गांभीर्याने लक्ष देऊन संयुक्तपणे तपास व कारवाई करावी.

## चरणगाव ग्रामपंचायत प्रकरणात दणका

# सरपंच मेघा देशमुख, सचिव जयेश तायडे यांच्यावर गुन्हा दाखल

प्रतिनिधी १ सप्टेंबर

**अकोला :** चरणगाव ग्रामपंचायतीतील 14 लाख 65 हजार 500 रुपयांच्या कथित आर्थिक अपहार प्रकरणाला आता वेगळे वळण लागले आहे. सरपंच मेघा प्रमोद देशमुख आणि ग्रामपंचायत सचिव जयेश तायडे यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेतील कलम 316(5), 318(4), 336(3) आणि 3(5) अंतर्गत गुन्हा दाखल झाल्याची माहिती आहे. गंभीर स्वरूपाच्या या कारवाईमुळे ग्रामपंचायत वर्तुळात खळबळ उडाली असून, या प्रकरणाच्या निष्पक्ष तपासाची मागणी जोर धरत आहे.संबंधित कलमांमध्ये आर्थिक गैरव्यवहार, फसवणूक, विश्वासघात, बनावट कागदपत्रे तसेच सामायिक हेतूने केलेल्या कृत्यांशी संबंधित आरोपांचा समावेश आहे. मात्र,




या आरोपांची अंतिम सत्यता न्यायालयीन प्रक्रियेत आणि तपासातूनच स्पष्ट होणार आहे. त्यामुळे तपास यंत्रणेकडून प्रत्येक कागदपत्र, आर्थिक व्यवहार आणि संबंधित निर्णयांची सखोल छाननी होणे अपेक्षित आहे. सरपंच मेघा प्रमोद देशमुख या राजकीय पार्श्वभूमी असलेल्या देशमुख कुटुंबातील असल्याने या कारवाईची स्थानिक राजकीय वर्तुळात विशेष चर्चा सुरू झाली आहे. मेघा देशमुख यांचे पती प्रमोद पंजाबराव देशमुख हे पंचायत समिती पातूरचे माजी सभापती आहेत. त्यांच्या सासूबाई विमलताई याही माजी सभापती राहिल्या आहेत. तसेच त्यांचे सासरे खरेदी-विक्री सोसायटीचे सदस्य असल्याची माहिती आहे. एका बाजूला राजकीय आणि सामाजिक क्षेत्रात प्रभाव असलेले कुटुंब आणि दुसऱ्या बाजूला ग्रामपंचायतीच्या निधीशी संबंधित गंभीर प्रकरणामुळे देशमुख कुटुंबाच्या राजकीय प्रतिष्ठेवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. मात्र, केवळ नातेसंबंध किंवा राजकीय पार्श्वभूमीच्या आधारे कोणालाही दोषी ठरवता येणार नाही; संबंधितांची भूमिका तपासातून स्पष्ट होणे आवश्यक आहे.या प्रकरणातील 14 लाख 65 हजार 500 रुपयांचा कथित अपहार नेमका कसा झाला? निधी कोणत्या कामांसाठी मंजूर करण्यात आला होता? संबंधित कामे प्रत्यक्षात झाली का? कागदपत्रे व आर्थिक व्यवहारांमध्ये कोणत्या प्रकारच्या नोंदी करण्यात आल्या? तसेच या व्यवहारांना मंजुरी देताना कोणाची भूमिका होती, याची उत्तरे आता तपासातून समोर येणे गरजेचे आहे. ग्रामपंचायत हा थेट जनतेच्या पैशाशी संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेचा घटक असल्याने या प्रकरणाकडे केवळ दोन व्यक्तींविरुद्ध दाखल झालेला गुन्हा म्हणून न पाहता संपूर्ण आर्थिक व्यवहाराची चौकशी करण्याची गरज आहे. या प्रकरणात उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर जिल्हा परिषद प्रशासनानेही कारवाईची दिशा स्पष्ट केली असून, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी संबंधित बीडीओ यांना गुन्हा दाखल करण्याबाबत पत्र दिल्याची माहिती आहे. त्यामुळे आता पोलिस तपास आणि प्रशासकीय चौकशीला महत्त्व प्राप्त झाले आहे.

# बसस्थानक नजीकचे फुटपाथ विक्रेत्यांनी व्यापले

## अतिक्रमण विरोधी पथकाने आज त्यांना हटवले

प्रतिनिधी १ सप्टेंबर

**अकोला:** बसस्थानक परिसराला अतिक्रमण करणाऱ्यांचा वेढा दिसतो. त्यातून फुटपाथ देखील सुटले नाहीत. खाद्य पदार्थ विक्रेत्यांनी फुटपाथ व्यापले होते. महापालिका अतिक्रमण विरोधी पथकाने त्यांच्या विरोधात कारवाई केली. शहर अतिक्रमण मुक्त करण्यासाठी महापालिका प्रशासनाने काही महिन्यांपासून मोहीम हाती घेतली आहे. शहराच्या विविध भागात अतिक्रमण हटवले जात आहे. आज या पथकाने बसस्थानक परिसरात आपला मोर्चा वळवला. बसस्थानक परिसरातील घाऊक विक्रेत्यांना फुटपाथ वरून हटवले. या ठिकाणी नव्याने अतिक्रमण पुन्हा होऊ नये याकडे लक्ष देणे आवश्यक आहे. नाही तर सततच्या मोहिमेला अर्थ उरणार नाही असे नागरिकांचे म्हणणे आहे.



# आमदार साजीद खान पठाण यांचा गंगानगर परिसरात भव्य सत्कार सोहळा

प्रतिनिधी १ सप्टेंबर

**अकोला:** ३०ऑगस्ट रोजी सायंकाळी गंगानगर परिसरात अतिशय देखणा सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. आमदार साजिद खान पठाण यांच्या निधीतून २.५ कोटी रुपयांच्या काँक्रीट रस्त्याचे काम करण्यात आले. या कार्यक्रमाचे आयोजन गंगानगरचे रहिवासी, ॲटलास ट्रान्सपोर्टचे संचालक झाकीर भाई आणि मस्जिद आयेशा ट्रस्ट यांनी केले होते.काँग्रेसचे आमदार साजिद खान यांच्यासह सर्व काँग्रेस नगरसेवकांचा सत्कार करण्यात आला. पावसाळ्यापूर्वी नागरिकांच्या सोयीसाठी २०० हून अधिक ट्रक खडी टाकण्यात आली. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस समितीच्या



अल्पसंख्याक विभागाचे अध्यक्ष आमदार साजिद खान पठाण यांनी या विकासकामांबद्दल समाधान व्यक्त केले.ते म्हणाले, गंगा नगरमधील लोकांचा विश्वास आणि प्रेम ही काँग्रेस पक्षाची आणि महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांची सर्वात मोठी ताकद आहे. तसेच भव्य सत्काराबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. या कार्यक्रमाला ॲटलस ट्रान्सपोर्टचे संचालक झाकीर भाई आणि मशीद आयेशा ट्रस्ट आणि परिसरातील नागरिक उपस्थित होते. ईद मिलाद मिरवणुकीचे अध्यक्ष हाजी मुदाम, म.न.पा विरोधी पक्षनेते डॉ. झीशान हुसेन,नगर सेवक आझाद खान, अफसर कुरेशी,अब्दुल सलाम पहेलवान, गुड्डू खान पठाण, गजानन कांबळे, फिरोज खान,माजी नगर सेवक मोहम्मद इरफान, मोहम्मद शारीक, लाल खान पठाण, स्वर्गीय याकुब खान यांचा मुलगा,अल फारूक हॉटेलचे संचालक सलीम भाई, फिरोज पहेलवान आदी उपस्थित होते.

# कागदावर काम पूर्ण; गावात मात्र कामाचे अवशेषही नाहीत?

## पीआरसीच्या दौऱ्यापूर्वी विकासकामांची पडताळणी

प्रतिनिधी १ सप्टेंबर

**अकोला :** महाराष्ट्र विधिमंडळाच्या पंचायत राज समितीच्या अकोला दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर जिल्हा परिषदेमार्फत करण्यात आलेल्या विविध विकासकामांची प्रत्यक्ष पडताळणी करण्याची गरज निर्माण झाली आहे.

कागदोपत्री पूर्ण झालेली कामे प्रत्यक्षात अस्तित्वात आहेत का, कामांचा दर्जा कसा आहे आणि मंजूर निधीचा योग्य वापर झाला आहे का, याकडे आता पंचायत राज समितीच्या पाहणीत विशेष लक्ष राहण्याची शक्यता आहे.

जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या माध्यमातून ग्रामीण भागात रस्ते, शाळा, ग्रामपंचायत इमारती तसेच आरोग्य केंद्रे, पाणीपुरवठा, विविध विकासकामे केली जातात. या कामांसाठी मंजूर निधी, प्रशासकीय मान्यता, तांत्रिक मान्यता, कार्यादेश, मोजमाप पुस्तिका, देयके आणि काम पूर्ण झाल्याचे प्रमाणपत्र अशी कागदपत्रे तयार केली जातात. मात्र कागदोपत्री काम पूर्ण दाखविले असले तरी प्रत्यक्ष ठिकाणी कामाची स्थिती काय आहे, हा प्रश्न PRCच्या दौऱ्याच्या निमित्ताने महत्त्वाचा ठरणार आहे. दरम्यान, पंचायत राज समितीच्या अकोला दौऱ्यात जिल्हा परिषद, पंचायत समित्या, ग्रामपंचायती तसेच विविध योजनांच्या कामकाजाचा आढावा घेतला जाणार असल्याचे समोर आले आहे.

### कुठे खर्च झाला, किती काम झाले?

जिल्ह्यातील निवडक विकासकामांची स्वतंत्र पडताळणी केल्यास अनेक प्रश्नांची उत्तरे मिळू शकतात. मंजूर रक्कम किती, प्रत्यक्ष खर्च किती, कामाची सुरुवात कधी झाली, पूर्णत्वाचा दाखला कधी देण्यात आला आणि आज त्या कामाची प्रत्यक्ष स्थिती काय आहे, याची माहिती तपासणे गरजेचे आहे.विशेषतः बांधकाम विभागातील कामांसाठी मोजमाप पुस्तिका आणि अंतिम देयकांची नोंद महत्त्वाची ठरणार आहे. जिल्हा परिषदेच्या वित्त विभागाकडून विविध विभागांच्या नस्ती व देयकांची पडताळणी तसेच अंतर्गत लेखापरीक्षण केले जाते.

### गावागावांत होणार कागद विरुद्ध वास्तवाची परीक्षा

आता गावपातळीवरील विकासकामांची प्रत्यक्ष पाहणी महत्त्वाची ठरणार आहे. एखाद्या कामाला पूर्णत्वाचा दाखला दिला असेल, तर त्या ठिकाणी प्रत्यक्ष काम उभे आहे का? काम वापरात आहे का? नागरिकांना त्याचा लाभ मिळतो आहे का? कामाची गुणवत्ता समाधानकारक आहे का? याची पडताळणी केल्याशिवाय विकासकामांचे खरे चित्र समोर येणार नाही.

# जिल्ह्यात मच्छरांचा वाढता प्रकोप

**अकोला :** जिल्ह्यात सध्या मच्छरांचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात वाढला असून, नागरिकांमध्ये डासांमुळे होणाऱ्या आजारांची भीती निर्माण झाली आहे. शहरासह ग्रामीण भागातील अनेक ठिकाणी साचलेले पाणी, नाल्यांची अस्वच्छता आणि कचऱ्याचे ढीग यामुळे मच्छरांची उत्पत्ती वाढत असल्याचे चित्र आहे.

पहिला वाढदिवस

चि.शिवेन प्रवीण देशमुख
रा.करडा ता.रिसोड









सिटी न्यूज सुपरफास्ट बुलडाणा
मंगळवार, दि. १ सप्टेंबर २०२६ Web. http://epaper:citynewssuperfast.com


# खामगावात कौटुंबिक वादातून पत्नीची हत्या

## पतीला अटकः चारित्र्याच्या संशयावरून वाद विकोपाला!

प्रतिनिधी १ सप्टेंबर

**खामगाव :** चारित्र्याच्या संशयावरून झालेला कौटुंबिक वाद विकोपाला जाऊन पतीने पत्नीच्या डोक्यावर, हातावर आणि पायावर बेसबॉलच्या बॅटने बेदम मारहाण केली. या मारहाणीत गंभीर जखमी झालेल्या २६ वर्षीय पत्नीचा घटनास्थळीच मृत्यू झाल्याची घटना खामगावातील गोपाळ नगर घरकुल परिसरात रात्री घडली. या प्रकरणी शिवाजीनगर पोलिसांनी पतीविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करून त्याला अटक केली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गणेश महादेव डाबेराव (२६) आणि त्याची पत्नी लक्ष्मी गणेश डाबेराव (२६) हे गोपाळ नगर घरकुल परिसरात राहतात. ३० ऑगस्ट रोजी रात्री साडेआठच्या सुमारास त्यांच्या घरातून मोठ्याने आरडाओरड ऐकू आल्याने शेजाऱ्यांनी घराकडे धाव घेतली. त्यावेळी गणेश हा पत्नी लक्ष्मी हिला बेसबॉलच्या बॅटने मारहाण करीत असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. चारित्र्याच्या संशयावरून पती-पत्नीमध्ये वाद झाल्याचे पोलिस तपासात समोर आले आहे. या वादातून संतापलेल्या गणेशने लक्ष्मी ची डोक्यावर तसेच हात व पायावर बेसबॉलच्या बॅटने जोरदार हल्ला केला. यात ती गंभीर जखमी झाली; मात्र मारहाणीतच तिचा मृत्यू झाला.घटनेची माहिती मिळताच शिवाजीनगर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. गंभीर स्वरूपाची घटना असल्याने अपर पोलिस अधीक्षक पियूष जगताप, उपविभागीय पोलिस अधिकारी प्रदीप पाटील, शिवाजीनगर पोलिस निरीक्षक मंदार पुरी व पोलिस उपनिरीक्षक सरकटे यांनी सोमवारी पहाटे २:२० वाजता घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. पोलिसांनी घटनास्थळाची पाहणी करून आवश्यक ती माहिती व पुरावे संकलित करण्याची कार्यवाही केली.दरम्यान, लक्ष्मी यांचा मृतदेह खामगाव येथील उपजिल्हा सामान्य रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आला. या घटनेप्रकरणी फिर्यादी रोहन देवीदास घोडाम (२६) यांच्या तक्रारीवरून शिवाजीनगर पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम १०३ (१) अन्वये खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हा दाखल होताच पोलिसांनी गणेश डाबेराव याला अटक केली आहे. या हत्येमागील नेमका घटनाक्रम, वादाचे कारण आणि हत्येसाठी वापरण्यात आलेल्या बेसबॉलच्या बॅटसह अन्य बाबींचा तपास करण्यात येत आहे.

# खामगाव तालुक्याला दुष्काळग्रस्त जाहीर करा!

## शिवसेनेचे एसडीओंना निवेदन

प्रतिनिधी १ सप्टेंबर



**खामगाव :** खामगाव तालुक्यात ई-पीक पाहणीचे काम तातडीने पूर्ण करण्यात यावे तसेच महिनाभरापासून पावसाने दांडी मारल्याने नुकसान झालेल्या पिकांचे पंचनामे करून खामगाव तालुका कोरडा दुष्काळग्रस्त जाहीर करण्यात यावा,अशी मागणी शिवसेना,युवासेना, महिला आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी उपविभागीय अधिकारी यांना निवेदनाद्वारे मागणी केली आहे. निवेदनात म्हटले आहे की,खरीप हंगामातील ई-पीक पाहणी वेळेत पूर्ण झाली नाही तर शेतकऱ्यांच्या सातबारा उताऱ्यावर पीकपेरा नोंद होण्यास अडचणी निर्माण होऊ शकतात.परिणामी बँक, पीक विमा, फळपीक अनुदान व इतर शासकीय योजनांचा लाभ घेताना शेतकऱ्यांना अडचणींचा सामना करावा लागू शकतो. मागील महिन्याभरापासून पावसाने दांडी मारल्याने कोरडवाहू पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

काही शेतकऱ्यांकडे सिंचनाची सुविधा असली तरी वारंवार होणारे भारनियमन व वीज खंडिततेमुळे पिकांना आवश्यक पाणी देणे शक्य होत नसल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे नुकसानग्रस्त पिकांचे तातडीने पंचनामे करून शेतकऱ्यांना शासनाकडून आर्थिक मदत द्यावी, खामगाव तालुका कोरडा दुष्काळग्रस्त जाहीर करावा आणि ई-पीक पाहणीची प्रक्रिया त्वरित पूर्ण करून शेतकऱ्यांचा त्रास दूर करावा,अशी मागणी शिवसेनेचे वतीने केली आहे. मागण्या मान्य न झाल्यास शेतकऱ्यांच्या हितासाठी लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन करण्याचा इशाराही देण्यात आला आहे. यावेळी शिवसेना उपजिल्हाप्रमुख संजय आवताडे, तालुकाप्रमुख राजेंद्र बघे,शिवसेना नेते गजानन लोखंडकर,शहरप्रमुख चेतन ठोंबरे,युवासेना तालुका प्रमुख अमोल फेरंग,बहादूर वाघे युवा सेना तालुकाप्रमुख महिला आघाडी तालुकाप्रमुख जयश्री देशमुख, महिला आघाडी उपतालुकाप्रमुख ज्योती बुजाडे,कल्पना गायगोड, निर्मलाबाई हेलोडे, शिवसेना उप तालुकाप्रमुख गोपाल भिल, उपतालुकाप्रमुख गजानन मोरखडे, किसान सेना तालुकाप्रमुख सुभाष वाकुडकर, उपतालुकाप्रमुख प्रवीण धामोडे, विधानसभा संपर्कप्रमुख सोपान वाडेकर,विकास जवंजाळ शहर समन्वयक भाऊ बिडकर,करण छापरवाल उपशहर प्रमुख, भूमिपुत्र वैद्यकीय मदत कक्ष जिल्हा संघटक शुभम मोरे, बांधकाम कामगार सेनेचे शुभम वावरे,प्रकाश हिवराळे अनुसूचित जाती जमाती तालुकाप्रमुख,उपतालुकाप्रमुख मंगेश काळे,विभाग प्रमुख नामदेव ताले,ओम देशमुख निवृत्ती शेवाळे चेतन शेलकर प्रभाकर बघे नारायण टिकार महादेव टिकार गणेश ढगे प्रभू घोंगे सुनील नवले मारुती जगताप मुकुंद चिकटे योगेश देशमुख राजेश गावंडे लक्ष्मण सोळंके गोपाल शेळके राम कृष्ण वायाळ यांच्यासह शिवसेना पदाधिकारी व शिवसैनिक शेतकरी बहुसंख्येने उपस्थित होते. यांच्यासह शिवसेना, युवासेना, महिला आघाडीचे पदाधिकारी, शिवसैनिक व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# केंद्रीय मानवाधिकार वृत्तपत्राच्या क्राईम रिपोर्टरपदी प्रा. शुभम प्रविण सावळे यांची नियुक्ती

प्रतिनिधी १ सप्टेंबर



**मलकापूर :** भारत सरकारच्या माहिती व प्रसारण मंत्रालयांतर्गत अधिकृत नोंदणीकृत असलेल्या 'केंद्रीय मानवाधिकार' या राष्ट्रीय हिंदी दैनिक व साप्ताहिक वृत्तपत्र समूहाच्या क्राईम रिपोर्टर पदी मलकापूर (जि. बुलढाणा) येथील तरुण व अभ्यासू समाजभूषण प्रा शुभम प्रविण सावळे यांची नुकतीच नियुक्ती करण्यात आली आहे. सदर नियुक्तीचे अधिकृत पत्र वृत्तपत्राचे मुख्य संपादक श्री. मिलिंद दहिवाले यांच्या मान्यतेने नुकतेच जारी करण्यात आले. असून, समाजातील ज्वलंत प्रश्नांना देणार वाचा प्रा शुभम सावळे यांच्याकडे वृत्तपत्राच्या क्राईम रिपोर्टर पदाची महत्त्वपूर्ण जबाबदारी सोपवण्यात आली आहे. या माध्यमातून ते: समाजातील वाढते गुन्हेगारी प्रकार, भ्रष्टाचार आणि अन्यायाविरुद्ध आवाज उठवणे, मानवाधिकार उल्लंघन, महिलांवरील अत्याचार, हुंडा प्रथा आणि कौटुंबिक छळाच्या घटनांना आळा घालण्यासाठी जनजागृती करणे, बालमजुरी, कामगारांचे शोषण आणि शिक्षण क्षेत्राशी संबंधित मूलभूत समस्यांवर प्रकाश टाकणे, नशामुक्ती, समाजप्रबोधन आणि जनहितार्थ शासकीय योजना सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचवणे, या सर्व सामाजिक व कायदेशीर मुद्द्यांवर वृत्तपत्राच्या माध्यमातून सखोल व परखड वार्तांकन करणार आहेत.

### विविध क्षेत्रांतून कौतुक व शुभेच्छा

»प्रा शुभम सावळे यांच्या नियुक्तीमुळे मलकापूर व बुलढाणा परिसरासह पत्रकारिता क्षेत्रात आनंदाचे वातावरण आहे. निष्पक्ष आणि निर्भीड पत्रकारितेचा वसा घेत समाजहितासाठी कटिबद्ध राहण्याचा निर्धार सावळे यांनी व्यक्त केला आहे.

# गणेशोत्सवासाठी मंडळांना ऑनलाईन एनओसी सुविधा

**देऊळगाव राजा :** गणेशोत्सव २०२६ च्या पार्श्वभूमीवर सार्वजनिक गणेश मंडळांना गणेश मूर्ती स्थापना, मंडप उभारणी तसेच उत्सवाच्या विविध व्यवस्थांसाठी आवश्यक ना-हरकत परठानगी अर्ज ऑनलाइन पद्धतीने सादर करता येणार आहे. यासाठी इच्छुक गणेश मंडळांनी आवश्यक कागदपत्रासह विहित मुदतीत ऑनलाइन अर्ज सादर करावा, असे आवाहन न.प. मुख्याधिकारी अरुण मोकळ यांनी केले आहे. गणेश मंडळांनी प्रशासनाकडून आवश्यक परवानगी प्राप्त केल्यानंतरच मंडप उभारणी व इतर व्यवस्था कराव्यात. गणेशोत्सव काळात कायदा व सुव्यवस्था, सुरक्षितता तसेच पर्यावरणपूरक उत्सवाला प्राधान्य देत प्रशासनाने दिलेल्या नियम व सूचनांचे पालन करावे.

# बोगस बियाण्यांचे अहवाल शासनाकडे; शेतकऱ्यांना पुढील कार्यवाहीची प्रतीक्षा!

प्रतिनिधी १ सप्टेंबर

**खामगाव :** यंदाच्या खरीप हंगामात सोयाबीनच्या बोगस बियाण्यांबाबत मोठ्या प्रमाणात तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. या तक्रारींची कृषी विभागाकडून प्रत्यक्ष पाहणी करून पंचनामे करण्यात आले. त्यानंतर संबंधित प्रकरणांचे अहवाल तयार करून ते शासनाकडे सादर करण्यात आले आहेत; मात्र अहवाल सादर होऊन पंधरा दिवसांचा कालावधी लोटला असूनही शासनस्तरावर अद्याप कोणताही निर्णय झालेला नाही. त्यामुळे बोगस बियाण्यांमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना मदतीची प्रतीक्षा कायम आहे.

खामगाव तालुक्यात बोगस बियाण्यांबाबत सर्वाधिक १ हजार २१६ तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. तर शेगाव तालुक्यात १ हजार ५ तक्रारी नोंदविण्यात आल्या आहेत. सोयाबीन बियाण्यांची अपेक्षित उगवण न होणे तसेच पिकाचे नुकसान होणे, अशा स्वरूपाच्या तक्रारी शेतकऱ्यांकडून करण्यात आल्या आहेत. तक्रारी प्राप्त झाल्यानंतर कृषी विभागाच्या पथकांनी संबंधित शेतांमध्ये जाऊन पाहणी केली. नुकसानीची प्रत्यक्ष पाहणी करून पंचनामे करण्यात आले. या पंचनाम्यांच्या आधारे अहवाल तयार करून पुढील निर्णयासाठी शासनाकडे पाठविण्यात आले. मात्र, अहवाल सादर झाल्यानंतरही पुढील कार्यवाही झालेली नसल्याने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांमध्ये अस्वस्थता आहे.

**अहवालावर शासनाच्या निर्णयाकडे लक्ष**

बोगस बियाण्यांमुळे झालेल्या नुकसानीचे अहवाल शासनाकडे सादर करण्यात आले आहेत. या अहवालांची दखल घेऊन नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत देण्याबाबत निर्णय घ्यावा तसेच चौकशीत दोष आढळल्यास संबंधित बियाणे कंपन्यांवर नियमानुसार कारवाई करावी, अशीही शेतकऱ्यांची अपेक्षा आहे. मदत व कारवाईबाबत शासनाकडून कधी निर्णय घेतला जातो, याकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

### पंधरा दिवसांनंतरही निर्णय नाही: मदत कधी मिळणार?

» सोयाबीन बियाण्यांबाबत प्राप्त झालेल्या तक्रारींचे पंचनामे करण्यात आले आहेत. त्यानुसार संबंधित प्रकरणांचे अहवाल तयार करून शासनाकडे सादर करण्यात आले आहेत. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत देण्याबाबतचा निर्णय शासनस्तरावर होणार आहे.
**बाळासाहेब व्यवहारे,** कृषी अधिकारी

**शेतकऱ्यांची आर्थिक कोंडी**

यंदाच्या खरीप हंगामात बियाण्यांवर खर्च करूनही अपेक्षित उगवण न झाल्याने अनेक शेतकऱ्यांना आर्थिक फटका बसला आहे. बियाणे, पेरणी आणि मशागतीचा खर्च करूनही पीक हाताशी न आल्याने शेतकऱ्यांची आर्थिक कोंडी झाली आहे.

# काटी खूनप्रकरणी चौघांच्या पोलिस कोठडीत वाढ

## हटकल्यानंतर चाकूने वार करून केली होती हत्या

प्रतिनिधी १ सप्टेंबर

**मलकापूर :** नांदुरा तालुक्यातील काटी येथे चोरीच्या उद्देशाने आलेल्या चार अनोळखी व्यक्तींना हटकून त्यांचा पाठलाग करणाऱ्या ५२ वर्षीय रायसिंग सोळंके यांच्या पोटावर चाकूने वार करून हत्या केल्याप्रकरणी अटक करण्यात आलेल्या चारही आरोपींच्या पोलिस कोठडीत मलकापूर न्यायालयाने २ सप्टेंबरपर्यंत वाढ केली आहे. न्यायालयाने सोमवारी (दि. ३१ ऑगस्ट) हा आदेश दिला. तपासादरम्यान पोलिसांनी संतोष शिवबासअप्पा पवार (२५, रा. लालगोटा मदापुरी, ता. मुक्ताईनगर, जि. जळगाव) आणि दिनेश तुकाराम चव्हाण (२५, रा. डेबुजी नगर, राहटगाव, जि. अमरावती, ह. मु, पूर्णाड फाटा, ता. मुक्ताईनगर, जि. जळगाव) यांना २५ ऑगस्ट रोजी अटक केली. त्यानंतर राजू उर्फ कटरू अदमास पवार (२५) आणि चरण शंकर पवार (३०, दोघे रा. अंजनगाव सुर्जी, ह. मु. कुंडफाटा, ता. मलकापूर) यांना अटक करण्यात आली होती. चारही आरोपींची पोलिस कोठडी संपल्यानंतर त्यांना न्यायालयात हजर करण्यात आले होते.

**डीवायएसपींचे लक्ष**

काटी येथील घटनेमुळे जिल्ह्यात खळबळ उडाली होती. मलकापूरचे उपविभागीय पोलिस अधिकारी सोहन माछरे या प्रकरणाच्या तपासावर जातीने लक्ष ठेवून असून, त्यांच्या मार्गदर्शनाखाली आरोपींची चौकशी सुरू आहे.

# आता नवमतदार नोंदणीला 1 सप्टेंबरपासून सुरुवात!

प्रतिनिधी १ सप्टेंबर

**खामगाव :** विशेष सखोल पुनरिक्षण (एसआयआर) प्रक्रियेदरम्यान ३१ ऑगस्ट रोजी प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे. एसआयआरची पुढील प्रक्रिया सुरू असतानाच निवडणूक विभागाकडून १ सप्टेंबरपासून नवमतदार नोंदणी मोहीम सुरू करण्यात येणार आहे. १ ऑक्टोबर २०२६ हा अर्हता दिनांक असून, त्या दिवशी तयाची १८ वर्षे पूर्ण करणाऱ्या पात्र नागरिकांना या मोहिमेत मतदार म्हणून नाव नोंदविता येणार आहे. नवीन मतदार नोंदणी करू इच्छिणाऱ्या पात्र नागरिकांनी आवश्यक कागदपत्रांसह संबंधित मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) यांच्याशी संपर्क साधावा. मतदार नोंदणीसाठी वयाचा, तसेच निवासाचा पुरावा सादर करणे आवश्यक आहे. युवकांनी आवश्यक कागदपत्रांसह वेळेत अर्ज करून मतदार यादीत आपले नाव नोंदवून घ्यावे, असे आवाहन निवडणूक विभागाकडून करण्यात आले आहे. पात्र

**ऑफलाइन अर्जाची सुविधा**

ऑफलाइन पद्धतीने मतदार नोंदणी करण्यासाठी संबंधित मतदान केंद्रावरील बीएलओकडे नमुना अर्ज क्रमांक ६ भरून द्यावा. अर्जासोबत आवश्यक कागदपत्रे जोडणे गरजेचे आहे. त्यानंतर बीएलओकडून अर्जाची पुढील प्रक्रिया केली जाईल.

**नोंदणीसाठी अशी आहेत आवश्यक कागदपत्रे !**

१ ऑक्टोबर २०२६ रोजी १८ वर्षे पूर्ण झाल्याचा पुरावा म्हणून आधार कार्ड, दहावी किंवा बारावीचे बोर्ड प्रमाणपत्र, शाळा सोडल्याचा दाखला (एल.सी.), जन्म दाखला, पॅन कार्ड किंवा ड्रायव्हिंग लायसन्स यापैकी उपलब्ध कागदपत्रे सादर करता येतील. पत्ता पडताळणीसाठी अद्ययावत पत्त्यासह आधार कार्ड, रेशन कार्ड, अलीकडील वीज किंवा पाणी बिल, राष्ट्रीयीकृत बँकेचे पासबुक तसेच पालकांच्या मतदार ओळखपत्राची प्रत यापैकी आवश्यक कागदपत्रे सादर करता येतील. याशिवाय अलीकडे काढलेले दोन पासपोर्ट रंगीत फोटो आवश्यक आहेत.

» १८ वर्षे पूर्ण करणाऱ्या पात्र युवकांना नवमतदार म्हणून नोंदणीची संधी उपलब्ध आहे. युवकांनी आवश्यक कागदपत्रांसह वेळेत अर्ज करून मतदार यादीत नाव नोंदवून घ्यावे. ऑनलाइन तसेच ऑफलाइन नोंदणीची सुविधा उपलब्ध.
**डॉ. रामेश्वर पुरी,** उपविभागीय अधिकारी

**ऑनलाइन नोंदणी!**

नवमतदारांना ऑनलाइन पद्धतीनेही नोंदणी करता येणार आहे. यासाठी वोटर हेल्पलाइन ॲपच्या माध्यमातून किंवा केंद्रीय निवडणूक आयोगाच्या अधिकृत संकेतस्थळावर नमुना अर्ज क्रमांक ६ भरता येईल. त्यामुळे पात्र नागरिकांना घरबसल्या मतदार नोंदणीसाठी अर्ज करता येणार आहे.

# सिंदखेडराजा बाजार समितीत मूगाला 12,111 रुपयांचा विक्रमी दर

प्रतिनिधी १ सप्टेंबर

**सिंदखेडराजा :** खरीप हंगामातील मूग पिकाच्या विक्रीचा श्रीगणेश सोमवारी सिंदखेडराजा कृषी उत्पन्न बाजार समितीत झाला. खरीप हंगामातील पहिल्याच पिकाला तब्बल १२,१११ रुपये प्रतिक्विंटल असा विक्रमी भाव मिळाला आहे. तालुक्यातील शेतकरी मारुती ठाकरे यांनी आपल्या शेतातून पिकवलेला नवीन मूग सोमवारी विक्रीसाठी बाजार समितीत आणला होता. बाजार समितीच्या आवारात व्यापारी तुळशीराम झोरे आणि श्रीपाद महाराज मुळे यांच्या हस्ते धान्याचे पारंपरिक पद्धतीने पूजन करून खरेदीचा शुभारंभ करण्यात आला. यानंतर पार पडलेल्या लिलावात गोकुळ मेहेर यांनी १२,१११ रुपयांची सर्वोच्च बोली लावून ही मूग खरेदी पूर्ण केली.

हंगामातील पहिला मूग बाजारात आणल्याबद्दल शेतकरी मारुती ठाकरे यांचा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वतीने शाल, श्रीफळ आणि ड्रेस देऊन यथोचित सत्कार करण्यात आला. याप्रसंगी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव ओंकार महाजन, आडत दुकानदार अमोल वायकोस, हरीश बाहेती, सुदाम किंगरे, संतोष घुगे, रमजान दर्गावाले यांच्यासह परिसरातील सर्व प्रमुख अडते, व्यापारी आणि शेतकरी बंधू मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गणरायांच्या आगमनाची तयारी अंतिम टप्प्यात; मूर्तिकार व्यस्त!

## सार्वजनिक मंडळांच्या मागणीनुसार गणेश मूर्तींना अंतिम रूप; रंगकाम, सजावटीला वेग!

प्रतिनिधी १ सप्टेंबर



**खामगाव :** गणेशोत्सवाच्या आगमनाची चाहूल लागताच शहरातील मूर्तिकारांच्या कार्यशाळा गजबजल्या आहेत. विविध रूपांतील गणेशमूर्तींना अंतिम आकार देण्यासह रंगकाम आणि सजावटीचे काम सध्या युद्धपातळीवर सुरू आहे. आगामी १४ सप्टेंबरपासून गणेशोत्सवाला प्रारंभ होणार असल्याने हातात मोजकेच दिवस उरले आहेत. त्यामुळे मूर्तिकारांची धावपळ वाढली असून, सार्वजनिक गणेश मंडळांच्या मागणीनुसार मूर्ती तयार करण्याचे काम अंतिम टप्प्यात पोहोचले आहे. खामगाव शहरातील बाळापूर फैल, शिवाजी वेस (कुंभारवाडा) परिसरात अनेक मूर्तिकारांच्या कार्यशाळांमध्ये बाप्पांच्या आकर्षक मूर्ती आकार घेत आहेत. काही मूर्तींचे सांगाडे व मातीचे काम पूर्ण झाले असून, सध्या रंगकाम आणि अंतिम सजावटीवर भर दिला जात आहे. शहरातील मूर्तींना स्थानिक ग्राहकांसोबतच जिल्हाभरातून मागणी असल्याने मूर्तिकारांनी वेळेत ऑर्डर पूर्ण करण्यासाठी कामाचा वेग वाढविला आहे. दरम्यान, गणेशभक्त आणि सार्वजनिक मंडळांचे कार्यकर्ते कार्यशाळांमध्ये जाऊन विविध मूर्तींची पाहणी करीत आहेत.

**खामगावात पोळ्यानंतर 'बुकिंग' वाढणार!**

गणेशभक्तांकडून मूर्तीची प्रत्यक्ष पाहणी करून बुकिंग निश्चित करण्याची परंपरा आहे. पोळा सणानंतर नागरिक आणि मंडळांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने मूर्तिकारांच्या कार्यशाळांना भेट देत असल्याने त्यानंतर बुकिंगमध्ये वाढ होण्याची शक्यता आहे.

# वीज बिल थकले तर वीजपुरवठा होणार स्वयंचलित बंद!

## महावितरणची स्वयंचलित यंत्रणा कार्यान्वित; बिल भरल्यानंतर ३० मिनिटांत वीजपुरवठा पूर्ववत!

प्रतिनिधी १ सप्टेंबर

**खामगाव :** महावितरणने जिल्हाभरात बसविलेल्या स्मार्ट वीज मीटरची यंत्रणा आता प्रत्यक्ष कार्यान्वित झाली आहे. वीज बिल भरण्याची अंतिम मुदत उलटल्यानंतरही थकीत बिलाचा भरणा न केल्यास सर्व्हरच्या माध्यमातून वीजपुरवठा स्वयंचलितपणे खंडित केला जात आहे. कोणत्याही कर्मचाऱ्याच्या प्रत्यक्ष हस्तक्षेपाशिवाय होणाऱ्या या कारवाईमुळे ग्राहकांनी वीज बिल वेळेत भरण्याची दक्षता घेणे आवश्यक झाले आहे. स्मार्ट मीटर महावितरणच्या मुख्य सर्व्हरशी जोडलेले असल्याने ग्राहकांचा वीज वापर, बिलाची स्थिती तसेच थकीत रकमेची माहिती डिजिटल पद्धतीने उपलब्ध होत आहे. त्यामुळे वीजबिलाच्या थकबाकीवर लक्ष ठेवणे आणि त्यानुसार कारवाई करणे महावितरणला अधिक सुलभ झाले आहे.

**ग्रामीण भागात माहितीअभावी गोंधळ !**

स्मार्ट मीटरमुळे ग्राहकांना चालू महिन्यातील वीज वापर, बिलाची रक्कम आणि अंतिम तारीख मोबाइलवर पाहता येते. यासाठी महावितरणने स्वतंत्र ॲपची सुविधाही उपलब्ध करून दिली आहे; मात्र ग्रामीण भागात या सुविधेबाबत पुरेशी जनजागृती झालेली नसल्याने अनेक ग्राहक अद्याप कागदी बिलावरच अवलंबून आहेत. डिजिटल साक्षरतेचा अभाव आणि इंटरनेटच्या मर्यादित सुविधेमुळे बिल भरण्यास विलंब होण्याची शक्यता आहे.पैशाची तजवीज आधीच करावी लागणार! स्मार्ट मीटरमुळे वीजबिल भरण्याची प्रक्रिया अधिक काटेकोर झाली आहे. बिलाची अंतिम मुदत उलटल्यानंतर थकबाकी राहिल्यास वीजपुरवठा स्वयंचलितपणे खंडित होण्याची शक्यता असल्याने ग्राहकांना आता बिलाच्या रकमेचे नियोजन आधीच करावे लागणार आहे.

**बिल भरताच ३० मिनिटांत वीज सुरू!**

थकीत बिल ऑनलाइन अथवा अधिकृत केंद्रावर भरल्यानंतर सर्व्हरच्या माध्यमातून साधारण ३० मिनिटांत वीजपुरवठा आपोआप पूर्ववत होतो. सहा तासांत वीज सुरू न झाल्यास ग्राहकाला तक्रार करता येते.

**सकाळीच होते 'ऑटो कट'**

ग्राहकांना रात्रीच्या वेळी अचानक अंधारात ठेवले जात नाही. अंतिम मुदत उलटल्यानंतर निर्धारित प्रक्रियेनुसार सकाळी सुमारे ९ वाजता सर्व्हरवरून स्वयंचलित वीजपुरवठा खंडित केला जातो.

» स्मार्ट मीटरची यंत्रणा आता कार्यान्वित झाली आहे. त्यामुळे ग्राहकांनी गैरसोय टाळण्यासाठी शक्यतो अंतिम तारखेपूर्वीच वीज बिलाचा भरणा करावा.
**सुरेंद्र कटके,** अधीक्षक अभियंता

**ॲपवर वापर, बिल आणि अंतिम तारीख**

महावितरणच्या ॲपवर ग्राहकांना चालू वीज वापर, बिलाची रक्कम आणि भरण्याची अंतिम तारीख पाहता येते.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी सायरन ऑफसेट प्रिंटर्स एमआयडीसी क्र. २ पोलिस स्टेशन समोर ता. जि. अकोला येथे मुद्रित करून सिटी न्युज सुपरफास्ट कार्यालय श्री छत्रपती शिवाजी महाराज नगर परिषद काम्पलेक्स, रेल्वे स्टेशन समोर खामगाव येथे प्रकाशित केले. ▪ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ▪ **संपर्क** – 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/26/A3072, RRC Helpline No. 8484842135